


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक
# सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २७७ ■ गुरूवार, दि.१६ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८
RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# लोकसभेत 850 जागा कशा ठरल्या?
## विरोधकांचा महिला आरक्षण विधेयकाला विरोध



वृत्तसंस्था १६ एप्रिल

**नवी दिल्ली:** महिला आरक्षण कायद्यात सुधारणा करणारी तीन विधेयके सध्या लोकसभेत चर्चेसाठी आहेत. विरोधी पक्षांनी या विधेयकांना विरोध केला आहे. काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई म्हणाले की, सरकार आपल्या ९०टक्के विधानांचीच पुनरावृत्ती करत आहे.

सरकारने लोकसभेत ८५० जागा ठेवण्याचा निर्णय कसा घेतला, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सपाचे खासदार अखिलेश यादव यांनी मुस्लिम महिलांना आरक्षण देण्याबद्दल भाष्य केले. यावर अमित शाह यांनी हे असंवैधानिक असल्याचे उत्तर दिले.

समाजवादी पक्षाने सर्व तिकिटे मुस्लिम महिलांना द्यावीत, याला आमचा कोणताही आक्षेप नाही. १६ आणि १७ एप्रिल रोजी विधेयकांवरील चर्चेसाठी पंधरा तासांचा वेळ देण्यात आला आहे.

उद्या दुपारी ४ वाजता मतदान होईल. या सुधारणा विधेयकानुसार लोकसभेतील खासदारांची संख्या ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे.सध्या ही संख्या ५४३ आहे. राज्यांना ८१५ जागा आणि केंद्रशासित प्रदेशांना ३५ जागा मिळतील. जागांची नेमकी संख्या निश्चित करण्यासाठी मतदारसंघांची पुनर्रचनाही केली जाईल. महिलांसाठी २७३ जागा राखीव ठेवण्यात येतील.

### महिलांसाठी एक ऐतिहासिक विधेयक
महिला आरक्षण विधेयकावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले, हे महिलांसाठी एक ऐतिहासिक विधेयक आहे. माझ्या मते, देशाच्या इतिहासातील हे एक क्रांतिकारक विधेयक आहे. लोकशाहीमध्ये महिलांना समान संधी मिळतील. 'महिला आरक्षण विधेयकावर काँग्रेस खासदार राजीव शुक्ला म्हणाले, 'सर्व विरोधी पक्षांनी एकत्रितपणे ठरवले आहे की ते महिला आरक्षणाचे समर्थन करतात आणि आम्हाला महिलांसाठी आरक्षण हवे आहे. आम्ही २०२३ मध्ये मंजूर झालेल्या ठरावाच्या पाठीशी उभे आहोत, परंतु परिसीमनाच्या माध्यमातून ते सर्व वर्गांमध्ये फूट पाडण्याचा आणि घटनात्मक चौकटीला नुकसान पोहोचवण्याचा कट रचत आहेत आणि आम्ही त्याला विरोध करतो.

### लोकसभेत १८ तास तर राज्यसभेत १० तास चर्चा
कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल संविधान (१३१ वी सुधारणा) विधेयक आणि पुनर्रचना विधेयक (सुधारणा) विधेयक सादर करतील, तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह केंद्रशासित प्रदेश कायदा (सुधारणा) विधेयक, २०२६ विधेयक सादर करतील. यावर चर्चेसाठी १८ तासांचा वेळ निश्चित केला आहे. यानंतर राज्यसभेत १० तास चर्चा होईल. पंतप्रधान मोदी उद्याच चर्चेदरम्यान आपले म्हणणे मांडू शकतात. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी बुधवारी विरोधी पक्षांच्या नेत्यांसोबत बैठक घेतली. ते म्हणाले की, विरोधक महिला आरक्षणाच्या विरोधात नाहीत, परंतु लोकसभेतील जागा वाढवण्याच्या विरोधात आहेत. संपूर्ण विरोधक संसदेत याच्या विरोधात मतदान करतील. या बैठकीत राहुल गांधी आणि टीएमसी, आरजेडी, शिवसेना (यूबीटी), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद गट), आपचे नेते उपस्थित होते.

### आम्ही मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला विरोध करत आहोत
महिला आरक्षण विधेयकावर बोलताना, डीएमके खासदार टी. शिवा म्हणाले, 'आम्ही मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला विरोध करत आहोत. इतकेच नाही, तर ते महिला आरक्षणाला या विधेयकाशी जोडण्याचा प्रयत्न करत आहेत. आम्ही नेहमीच महिलांच्या हक्कांच्या बाजूने राहिलो आहोत. आम्ही सध्याच्या ५४३ जागांमध्ये आरक्षण देण्यास तयार आहोत, ज्याला आम्ही पूर्वी एकमताने पाठिंबा दिला होता. त्यांनी तिन्ही विधेयके एकत्र करून एकच विधेयक बनवले आहे. यामुळे भविष्यात दक्षिणेकडील राज्यांना कोणतेही प्रतिनिधित्व मिळणार नाही.'

कैसा हराया...
## सहर शेखचं नगरसेवकपद धोक्यात

प्रतिनिधी १६ एप्रिल

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत मुंब्रा परिसरातील चर्चेत आलेला प्रभाग क्रमांक ३० या प्रभागातून एमआयएमच्या उमेदवार सहर शेख यांनी विजय मिळवत राजकारणात जोरदार एन्ट्री केली. पालिकेच्या निवडणुकीनंतर सहर शेख यांच्या कैसा हराया...या डायलॉगची ठाणे, मुंबईसह राज्यभरात मोठी चर्चा रंगलेली होती. आता याच सहर शेखकडून शासकीय यंत्रणांची दिशाभूल झाल्याचं समोर आलं आहे.त्यानंतर आता पुन्हा एकदा नगरसेवक सहर शेख चर्चेत आल्या आहेत. त्यांनी शासकीय यंत्रणांची दिशाभूल झाल्याचं समोर आल्यानंतर आता सहर शेख नॉट रिचेबल असल्याची माहिती समोर आली आहे.

वडीलांच्या जात प्रमाणपत्र वैधता प्रकरणावरुन सहर शेख यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. सहर शेख आणि वडील युनूस शेख नॉट रिचेबल झाले असल्याचं समोर आलं आहे. सहर शेख मुंब्रा प्रभाग क्रमांक ३० मधून श्ध्श् पक्षाच्या नगरसेविका आहेत. मात्र सहर शेख आणि त्यांचे वडील गेल्या काही दिवसांपासून मुंब्र्यात देखील नसल्याची माहिती आहे. जात प्रमाणपत्र वैधता प्रकरणी शेख परिवाराकडून कमालीची गुप्तता पाळली जात आहे.

# अकोला मनपातील सत्ताधाऱ्यांचा वाद पोलीस ठाण्यात
## शिवसेना पक्षनिरिक्षक राजन साळवी यांचा ठिय्या आंदोलनाचा इशारा



प्रतिनिधी १६ एप्रिल

**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेत भाजपचे सभापती विजय अग्रवाल आणि शिवसेनेचे (शिंदे गट) नगरसेवक सागर भारुका यांच्यात झालेल्या वादानंतर आता शहरात राजकीय वातावरण तापले आहे. अनधिकृत बॅनर काढण्यावरून झालेल्या वादात महापालिका कर्मचारी आणि शिवसेना नगरसेवकांमध्ये धक्काबुक्की झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. तर या प्रकरणात शिवसेना निरीक्षक राजन साळवी यांनी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या विरोधात कारवाई करा अशी मागणी करत ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला. शिवसेना नगरसेवक सागर भारुका यांच्या पाठिशी शिवसेना एकत्र होती असे चित्र होते. राज्यातील महायुतीत सत्तेत असलेले दोन्ही पक्षाचे नेते ऐकमेकांच्या विरोधात दंड थोपाटून कसे बसले आहेत. असा प्रश्न विचारला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शहरात लावण्यात आलेल्या एका बॅनरवरून वादाला तोंड फुटले. या बॅनरवर छत्रपती शिवाजी महाराज, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे फोटो होते. महापालिकेच्या मिश्रा नावाच्या कर्मचाऱ्याने हा बॅनर काढण्यासाठी कारवाई केली असता, तिथे उपस्थित असलेल्या शिवसेना कार्यकर्त्यांशी त्यांची बाचाबाची झाली.शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांनी आरोप केला आहे की, संबंधित महापालिका कर्मचाऱ्याने बॅनर न काढण्यासाठी पैशांची मागणी केली होती.



### सागर भारुका पोलिसांच्या ताब्यात
बुधवारी महापालिकेच्या आवारात सागर भारुका आणि विजय अग्रवाल यांच्यात पुन्हा एकदा शाब्दिक वाद झाला. या वादानंतर सागर भारुका आणि मंगेश काळे हे विजय अग्रवाल यांच्यावर धावून गेल्याचा आरोप होत आहे. दरम्यान, विजय अग्रवाल व महापालिका प्रशासनाने सागर भारुका यांच्या विरोधात वेगवेगळया तक्रारी दिल्यानंतर त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. सागर भारुका यांना पोलिसांनी आज ताब्यात घेतल्याची माहिती आहे.

# भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण शनिवारी अकोल्यात

प्रतिनिधी १६ एप्रिल





**अकोला :** भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण येत्या १८ एप्रिल रोजी राजराजेश्वर नगरीत येत असून, त्यांच्या उपस्थितीत भाजप अनुसूचित जाती मोर्चाचा भव्य कार्यकर्ता संवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे. मूर्तीजापूर रोडवरील सिटी स्पोर्ट्स येथे दुपारी ४ वाजता हा कार्यक्रम पार पडणार असून, याद्वारे भाजप जिल्ह्यात मोठे शक्तिप्रदर्शन करण्याची शक्यता आहे.या मेळाव्याला अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विश्वजीत गायकवाड यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तसेच भाजप विधिमंडळ प्रतोद आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री एड. आकाश फुंडकर, आमदार हरीश पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार वसंत खंडेलवाल आणि माजी महापौर शारदाताई खेडकर यांसारख्या जिल्ह्यातील दिग्गज नेत्यांची मांदियाळी एकाच व्यासपीठावर पाहायला मिळणार आहे. या मेळाव्यात रवींद्र चव्हाण हे मागासवर्गीय आघाडीच्या कार्यकर्त्यांशी आणि पदाधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांना संघटनात्मक बांधणीबाबत मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाला विजय अग्रवाल, संतोष शिवरकर, जयंत मसने, वैशालीताई पालीवाल, मायाताई दुतोंडे, हर्षद साबळे, अमोल गोगे, पवन महल्ले, श्रावण इंगळे यांसह भाजपचे सर्व सेल आणि आघाड्यांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. १८ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता मूर्तीजापूर रोडवरील सिटी स्पोर्ट्स येथे होणाऱ्या या मेळाव्यास मागासवर्गीय आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजप जिल्हा व शहर कार्यकारिणीच्या वतीने करण्यात आले आहे.

# सलग पाच दिवसांपासून अकोला तापलेला!
## जगात सर्वाधिक तापमानाची नोंद, एकाचा उष्माघाताने मृत्यू

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अकोला :** सलग चार दिवसांपासून अकोला देशातील सर्वाधिक तापमान असलेले शहर आहे. बुधवारी अमरावती देखील या यादीत आले. देशात सर्वाधिक तापमान असलेल्या पहिल्या दहा शहरांमध्ये सात शहरे महाराष्ट्रातील व या सात शहरांमध्ये चार शहरे विदर्भातील आहेत. हवामान खात्याच्या अंदाजानुसार अक्षय तृतीयेपर्यंत ही उष्णतेची लाट कायम असणार आहे. बुधवारी अकोल्यात एकाचा उष्माघाने मृत्यू झाल्याची माहिती आहे.

सूर्याचा कहर सुरू असून विदर्भात सूर्य अक्षरशः आग ओकत असल्यासारखी स्थिती आहे. कमाल तापमानाचा पारा ४४ अंश सेल्सिअसपालिकडे गेला आहे. विशेषतः अकोला, अमरावतीत उष्णतेचा कहर आहे. अकोल्यात बुधवारी अक्षरशः ४४.२ अंश सेल्सिअस तर अमरावती शहरात ४४ अंश सेल्सिअस इतके तापमान नोंदवले गेले. अकोला सलग चौथ्या दिवशी भारतातील सर्वाधिक उष्ण शहर ठरले. तर जगातही ते सर्वाधिक उष्ण ठरले. वर्धा, नागपूर या शहरात देखील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली. अक्षय्यतृतीयेपर्यंत उष्णतेची लाट कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

# हे नारीशक्ती नव्हे तर भाजपशक्ती विधेयक! - खा. संजय राऊत

प्रतिनिधी १६ एप्रिल



**मुंबई :** महिला आरक्षण लागू करण्यासाठी आजपासून संसदेच्या विशेष अधिवेशनाला सुरुवात होत आहे. हे अधिवेशन पुढील दोन दिवस चालणार आहे.२०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून महिला आरक्षण लागू करण्याच्या उद्देशाने हे विधेयक मांडण्यात आले असून, त्याचे अधिकृत नाव 'नारी शक्ती वंदन अधिनियम' असे आहे. यावर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी जोरदार हल्लाबोल केला. पाच राज्यात निवडणुका असताना नारीशक्ती विधेयक काढण्याची गरज नसल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. तसेच हे नारीशक्ती विधेयक नसून भाजपशक्ती विधेयक असल्याचा घणाघातही खा. संजय राऊत यांनी केंद्र सरकारवर केला.

लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी हे अधिवेशन बोलावण्यात आले आहे. यासाठी संविधानात दुरुस्ती करण्यात येणार आहे. सध्या लोकसभेत ५४३ खासदार आहेत, मात्र ही संख्या वाढून ८५० पर्यंत जाण्याची शक्यता आहे. तसेच, महाराष्ट्रातील लोकसभेच्या जागाही ४८ वरून ७२ पर्यंत वाढू शकतात, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. संजय राऊत म्हणाले की, हे विधेयक सप्टेंबर २०२३ साली मंजूर झाले आहे. केंद्र सरकार देशाला फसवत आहे. जे विधेयक मंजूर झाले, त्या विधेयकात जनगणनेबाबत काही महत्त्वाच्या सूचना होत्या.

### हे बिल मंजूर होईल या भ्रमात कोणी राहू नये!
हा केंद्र सरकारचा डाव आहे. पाच राज्यात निवडणूका असताना हे विधेयक आणणे गरजेचे नव्हते. महिला आरक्षण विधेयक मंजूर करताना जे कारस्थान हे सरकार करत आहे, त्यांनी इतिहासाच्या गोष्टी करू नये. मतदानातून हे बिल पाडले जाईल. या क्षणी सरकारचा आकडा २९२ वर आहे. तो फार तर ३०० होईल. आम्ही सगळे एकजुटीने काम करत आहोत. समाजवादी पार्टीचा आकडा मोठा आहे. तृणमूल काँग्रेसचा आकडा मोठा आहे.

# स्वामी इंजिनिअर्स समोर अधिकाऱ्यांचे लोटांगण
## खडका येथील दगड खाण उत्खनन वादाच्या भोवऱ्यात





प्रतिनिधी १६ एप्रिल

**अकोला :** तालुक्यातील खडका शिवारात सुरू असलेल्या श्री स्वामी समर्थ इंजिनिअर्स लि. (पुणे) यांच्या दगड खाणीचा प्रश्न आता चांगलाच पेटला आहे. गेल्या १५ दिवसांत महसूल विभागाच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालांमध्ये मोठी तफावत दिसून येत असून, प्रशासकीय स्तरावर नक्की काय चालले आहे, असा प्रश्न आता गावकरी विचारत आहेत. या दोन्ही अहवालाची स्वतंत्र चौकशी जिल्हाधिकाऱ्यांनी करण्याची गरज आहे. तहसिलदारांनी दिलेला अहवालानंतर उपविभागीय अधिकाऱ्यांचा अहवालाने प्रश्न उपस्थित होत आहे. तहसिलदाराच्या अहवालावर कारवाई का केल्या गेली नाही याची चौकशी जिल्हाधिकाऱ्यांनी करण्याची गरज आहे.प्रशासनाच्या या 'बदलेल्या' भूमिकेमुळे खडका येथील ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण असून, आता जिल्हाधिकारी यावर काय अंतिम निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### दुसरा अहवालः प्रशासकीय 'मलमपट्टी'?
मात्र, २ एप्रिल २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केलेल्या ताज्या अहवालात परिस्थिती वेगळीच रंगवण्यात आली आहे. या अहवालात खाण गावापासून ८०० मीटर दूर असल्याने दगड उडून जाण्याची शक्यता नाही. मूळ रस्ता वळवण्यात आला असला तरी, वाहतुकीसाठी पर्यायी कच्चा रस्ता उपलब्ध करून दिला आहे. ब्लास्टिंगपूर्वी अर्धा तास सूचना दिली जाते आणि दगड उडू नयेत म्हणून 'मॅटिंग'चा वापर केला जातो, असा दावा या अहवालात करण्यात आला आहे.

### पहिला अहवालः गंभीर उल्लंघनांचा पाढा
२३ मार्च २०२६ रोजी नायब तहसीलदार (महसूल) यांनी सादर केलेल्या अहवालात खाण मालकावर गंभीर ताशेरे ओढले होते. त्यामध्ये खालील मुद्द्यांचा उल्लेख होता. खाण धारकाकडे स्फोटकांचा परवाना मिळून आला नाही. खाणीतील ब्लास्टिंगमुळे खडका गावातील घरे आणि स्थानिक मंदिराला तडे गेल्याचे नमूद करण्यात आले होते.शेतकऱ्यांचा पूर्वापार चालत आलेला २२ फुटी रस्ता खाण कामामुळे नष्ट करण्यात आला. कामगारांना हेल्मेट, मास्क किंवा सुरक्षा बूट पुरवले जात नसल्याचे निदर्शनास आले होते.

### शेतकऱ्यांची भूमिका संशयास्पद?
या संपूर्ण प्रकरणात काही तक्रारदार शेतकऱ्यांनी आपली तक्रार मागे घेतल्याचेही समोर येत आहे. 'धुळीमुळे पिकांचे नुकसान होत असले तरी, कंपनीने रस्ता दिल्यास आमची तक्रार नाही,' अशा आशयाची पत्रे काही शेतकऱ्यांनी दिली आहेत. मात्र, गावातील घरांना गेलेले तडे आणि पर्यावरणाचे झालेले नुकसान यावर अद्याप ठोस तोडगा निघालेला नाही. सध्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी खाण धारकाला सीमांकन , सूचना फलक लावणे आणि पाण्याची फवारणी करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, खाणीची खोली मोजण्यासाठी ईटीएस मशीनद्वारे मोजणी करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.




CMYK CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# तेजस्विनी भवन : महिला सक्षमीकरणाचा नवा ‘अकोला पॅटर्न’

अकोला जिल्ह्यातील डाबकी रोड, उगलेवाडी येथे साकारलेले ‘तेजस्विनी भवन’ हे केवळ एक इमारत नसून महिलांच्या आर्थिक क्रांतीचे आणि जिद्दीचे प्रतीक आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) सुवर्णमहोत्सवी वर्षात उभे राहिलेले हे भवन राज्यातील अशा प्रकारचे पहिलेच पाऊल आहे.

महिला जेव्हा आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होते, तेव्हा केवळ तिचे कुटुंबच नाही, तर संपूर्ण समाजाचा विकास होतो. हेच ब्रीदवाक्य समोर ठेवून अकोला जिल्ह्यातील लोकसंचालित साधन केंद्र आणि बचत गटांतील महिलांनी आपल्या परिश्रमातून आणि योगदानातून ’तेजस्विनी भवन’ ही वास्तू उभी केली आहे. ही इमारत केवळ सिमेंट-काँक्रीटचे बांधकाम नसून महाराष्ट्रातील महिलांच्या स्वयंपूर्णतेचे एक आदर्श उदाहरण आहे.

महाराष्ट्रात ’माविम’ अंतर्गत अनेक उपक्रम राबवले जातात, परंतु साधन केंद्राने स्वतःच्या बळावर इमारत उभारण्याची ही राज्यातील पहिलीच घटना आहे. डाबकी



रस्त्यावरील उगलेवाडी येथे हे भवन साकारण्यात आले असून, यासाठी बचत गटातील महिलांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे. हा प्रकल्प इतर जिल्ह्यांसाठी आणि विभागांसाठी एक ’रोल मॉडेल’ ठरत आहे.

अकोला जिल्हा हा प्रामुख्याने तूर, सोयाबीन आणि कपाशी या पिकांसाठी ओळखला जातो. बचत गट, साधन केंद्रे यांच्या माध्यमातून या प्रमुख पिकांवर आधारित कृषी प्रक्रिया उद्योगांचे जाळे विणण्याचे नियोजन आहे. कच्च्या मालावर प्रक्रिया करून तो थेट बाजारात विक्रीसाठी उपलब्ध करून देणे, केवळ शेतीच नव्हे, तर इतर व्यावसायिक उपक्रमांची जोड देऊन महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, असे नियोजन आहे. त्याचप्रमाणे, महिला बचत गटांना मुख्य प्रवाहातील व्यवसायाशी जोडण्यासाठी आता ’महाबीज’सारख्या (महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ) संस्थांसोबतही काम करण्याचे नियोजन आहे. बीजोत्पादन कार्यक्रमाच्या विविध टप्प्यांवर बचत गटांच्या महिलांना सहभागी करून घेतल्यास, त्यांच्या उत्पादनाला हक्काची बाजारपेठ आणि अधिक उत्पन्न मिळणे शक्य होणार आहे. अशा विकासाच्या अनेक शक्याशक्यता धुंडाळून केंद्र पुढे पावले टाकत आहे.

माविमच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात महिलांनी स्वतःच्या हिंमतीवर ही वास्तू उभी करून आपण कोणावरही अवलंबून नसल्याचे सिद्ध केले आहे. ’तेजस्विनी भवन’ ही वास्तू महिलांच्या संघशक्तीचा विजय आहे. शेतीपूरक व्यवसायांसोबतच आधुनिक उद्योगांची जोड मिळाल्यास, अकोल्यातील या उपक्रमातून महाराष्ट्रात महिला आर्थिक सक्षमीकरणाची एक नवी लाट येईल, यात शंका नाही.

# डाटाच्या वतीने मुख्य सचिवांकडे उपवर्गीकरणाबाबत आक्षेप सादर

*सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट, २०२४ रोजी पंजाब राज्य विरुद्ध दविंदर सिंग या प्रकरणात अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणास तत्त्वतः मान्यता दिली आहे. मात्र कोणतेही उपवर्गीकरण हे ठोस, अद्ययावत व परिमाणात्मक सामाजिक-आर्थिक डेटावर आधारित असणे बंधनकारक आहे. तसेच डाटाच्या वतीने मुख्य सचिवांकडे उपवर्गीकरणाबाबत आक्षेप सादर केले आहे. राज्याने उपवर्गीकरण करताना, मनमानी टाळून तर्कसंगत व पारदर्शक निकष अवलंबणे आवश्यक आहे. हा उपाय केवळ ‘विकेस्ट ऑफ द विक’ घटकांपर्यंत लाभ पोहोचविण्यासाठीच मर्यादित असावा अशा स्पष्ट अटी घालून दिलेल्या आहेत.*

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार उपवर्गीकरण करण्यासंदर्भात राज्य शासनाने माजी न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय अभ्यास समिती स्थापन केली. या समितीने नुकताच आपला अहवाल मंत्रिमंडळाला सादर केला. या समितीच्या अभ्यास व शिफारशीनुसार राज्यात उपवर्गीकरणाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने निर्णय क्रमांक सीबीसी-२०२४/प्र. क्र. ७६ दिनांक १० एप्रिल, २०२६ नुसार राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय समिती नेमली असून याबाबत आक्षेप, हरकती व सूचना १५ एप्रिल, २०२६ पर्यंत मागविल्या आहेत. तसेच संबंधितांनी दिनांक १७/४/२६ व १८/४/२६ रोजी समितीसमोर आपल्या हरकती मांडण्याचे आवाहन केले आहे.

शासनाने बदर समितीचा अहवाल जाहीर न करता, अनुसूचित जातीच्या घटनात्मक आरक्षणाबाबत दूरगामी परिणाम करणारा महत्त्वपूर्ण निर्णय एवढ्या घाई घाईने घेण्याची प्रक्रिया का सुरू केली? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून शासनाच्या हेतूवर शंका घेण्यास वाव आहे.

वास्तविक पाहता शासनाने बदर समितीचा अहवाल प्रसिद्ध करून लोकांना बदर समितीने उपवर्गीकरणासाठी कोणता डेटा वापरला, कोणते निकष ठरविण्यात आले? कोणत्या जातींना ‘अधिक मागास’ म्हणून वर्गीकृत करण्यात येणार आहे? इत्यादीबाबी लोकांसमोर स्पष्ट करणे आवश्यक तर आहेच पण समितीने सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या अटी पूर्ण केल्या किंवा नाही याचीही माहिती लोकांसमोर ठेवण्यात आली पाहिजे. मात्र शासनाने या पारदर्शकता व निकषांचे पालन केले नाही, जे भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ व अनुच्छेद १६ चे सरळसरळ उल्लंघन आहे.

त्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर टिचर्स असोसिएशन, अमरावती च्या वतीने आक्षेप व सूचना नोंदविणारे निवेदन मुख्य सचिव यांना पाठवून १) बदर समितीचा संपूर्ण अहवाल तात्काळ सार्वजनिक करण्यात यावा. २) अहवाल सार्वजनिक केल्यानंतर किमान ६० दिवसांचा कालावधी हरकती व सूचनांसाठी देण्यात यावा.

३) सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या निकषांनुसार अद्ययावत व परिमाणात्मक डेटा सार्वजनिक करण्यात यावा. ४) वरील प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उपवर्गीकरण संदर्भातील कोणतीही प्रशासकीय किंवा कायदेशीर कारवाई स्थगित करण्यात यावी. तसेच उप वर्गीकरण लागू करावयाचे झाले तर नोकरी व शैक्षणिक क्षेत्रासोबतच राजकीय क्षेत्र (लोकसभा, राज्यसभा, विधीमंडळ, जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगर पालिका, पंचायत समिती व ग्राम पंचायत ), आर्थिक क्षेत्र व इतर सर्वच क्षेत्रात व आरक्षित आणि खुल्या प्रवर्गासाठी लागू करावे या मागण्या केल्या आहेत. शासनाने सदर निवेदनाची दखल घेऊन उचित कार्यवाही करावी, अन्यथा डाटाच्या वतीने सनदशीर जनआंदोलन तथा सर्वोच्च न्यायालयात घटनात्मक याचिका दाखल करण्यात येईल असे निवेदनातून डाटा चे विभागीय सचिव प्रा.डॉ.एम.आर.इंगळे यांनी स्पष्ट केले आहे.

# आशा भोसले ; संघर्षाच्या आगीतून तावून सुलाखून निघालेलं एक सुवर्णलेणं !



*भारतीय संगीत क्षेत्रातील एक तेजस्वी तारा, ज्याने सात दशकांहून अधिक काळ आपल्या सुरांनी जगाला मंत्रमुग्ध केले, त्या आशा भोसले आज आपल्यात नाहीत. ‘गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’मध्ये आपल्या गायकीची मोहोर उमटवणाऱ्या आशाताईंच्या निधनाने केवळ मंगेशकर कुटुंबच नाही, तर संपूर्ण कलाविश्व पोरके झाले आहे. मात्र, ज्या आवाजाने कोट्यवधी रसिकांना आनंद दिला, त्या आवाजाच्या मालकिणीने पडद्यामागे सोसलेल्या वेदना आणि केलेला संघर्ष कोणत्याही चित्रपटाला लाजवेल असाच होता. आशाताईंचा जीवनप्रवास संघर्षानेच सुरू झाला.*

इरू१९४३ मध्ये वडील पंडित दीनानाथ मंगेशकर यांच्या निधनानंतर, मंगेशकर कुटुंबावर मोठे संकट कोसळले. कुटुंबाला आधार देण्यासाठी आशाताईंनी वयाच्या अवघ्या १० व्या वर्षी प्रथमच मायक्रोफोन हाती धरला. सुरुवातीच्या काळात थोरली बहीण लता मंगेशकर यांच्या अफाट लोकप्रियतेच्या सावलीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणे हे त्यांच्यासमोर मोठे आव्हान होते. आशाताईंच्या आयुष्यातील सर्वात मोठे वळण वयाच्या १६ व्या वर्षी आले. त्यांनी लता दीदींचे सचिव असलेल्या गणपतराव भोसले यांच्याशी प्रेमविवाह केला. गणपतराव त्यांच्यापेक्षा २० वर्षांनी मोठे होते. या विवाहासाठी त्यांनी घराचा उंबरठा ओलांडला, ज्यामुळे मंगेशकर कुटुंबात मोठा दुरावा निर्माण झाला. मात्र, ज्या सुखी संसाराचे स्वप्न त्यांनी पाहिले होते, तिथे त्यांच्या नशिबी ‘नरक यातना’ आल्या. पतीला असलेले दारूचे व्यसन आणि सततची मारहाण यामुळे त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले होते. धक्कादायक वास्तव म्हणजे, त्या गर्भवती असतानाही त्यांना शारीरिक छळाला सामोरे जावे लागले आणि तिसऱ्या मुलाच्या वेळी त्यांना सासरच्यांनी घराबाहेर काढले. या मानसिक त्रासाला कंटाळून त्यांनी एकदा आत्महत्येचाही प्रयत्न केला होता, परंतु केवळ मुलांच्या ओढीने त्या पुन्हा जिद्दीने उभ्या राहिल्या. गाण्याच्या क्षेत्रात लता दीदी आणि आशाताई यांच्यात नेहमीच निरोगी स्पर्धा राहिली. अनेकदा लता दीदींनी ‘अश्लील’ किंवा ‘कठीण’ म्हणून नाकारलेली गाणी आशाताईंच्या वाट्याला आली आणि त्यांनी त्या गाण्यांचे सोने केले. ‘हम दोनो’ चित्रपटातील ‘अभि ना जाओ छोडकर’ हे गाणे त्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे. लता दीदींनी नाकारलेले हे गाणे आशाताईंनी इतक्या नजाकतीने गायले की ते अजरामर झाले. पुढे आर.डी. बर्मन यांच्याशी झालेला विवाह आणि त्यांनी निर्माण केलेली सांगीतिक जोडी भारतीय चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ ठरली.

वैयक्तिक दुःखांचे डोंगर आशाताईंचे आयुष्य केवळ यशाने भरलेले नव्हते, तर त्यात दुःखाचे अनेक डोंगरही होते. २०१२ मध्ये कन्या वर्षा भोसले हिची आत्महत्या आणि त्यानंतर मोठा मुलगा हेमंत याचा कर्करोगामुळे झालेला मृत्यू, हे धक्के पचवणे त्यांच्यासाठी अतिशय कठीण होते. आयुष्याच्या उत्तरार्धात आपल्या दोन तरुण मुलांना गमावण्याचे दुःख उराशी बाळगूनही त्या कलेशी एकनिष्ठ राहिल्या.एक अजरामर वारसा २० हून अधिक भाषांमध्ये आणि १२ हजारांहून अधिक गाणी गाऊन आशाताईंनी संगीताचा एक असा अढळ डोंगर उभा केला आहे, जो कधीही हलवता येणार नाही. ‘पिया तू अबतो आजा’ मधील मादकता असो किंवा ‘दिल चीज क्या है’ मधील वेदना, त्यांनी प्रत्येक भाव आपल्या सुरातून जिवंत केला. एक स्त्री म्हणून सोसलेला अन्याय आणि एक कलाकार म्हणून गाठलेले शिखर, हा त्यांचा प्रवास पिढ्यानपिढ्या प्रेरणा देत राहील. त्यांच्या जाण्याने भारतीय संगीताचा एक ‘सुवर्ण काळ’ खऱ्या अर्थाने संपला आहे.

## दिन विशेष

# भारतीय रेल्वेची १७३ वर्षे



१६ एप्रिल १८५३ रोजी मुंबईच्या बोरिबंदर (आताचे सीएसएमटी) ते ठाणे दरम्यान पहिली प्रवासी रेल्वे धावल्यापासून, भारतीय रेल्वेने १६ एप्रिल २०२६ रोजी १७३ वर्षांचा गौरवशाली प्रवास पूर्ण केला आहे. ३४ किमीचा हा प्रवास आज देशाच्या कानाकोपऱ्यात विस्तारला असून, वाफेच्या इंजिनापासून सुरू झालेली ही सफर आता हाय-स्पीड वंदे भारत आणि जवळपास १०० टक्के विद्युतीकरणापर्यंत पोहोचली आहे.

**१७३ वर्षांच्या प्रवासातील मुख्य पैलू (१८५३ - २०२६):**

**ऐतिहासिक सुरुवात:** पहिली गाडी १६ एप्रिल १८५३ रोजी दुपारी ३.३५ वाजता बोरीबंदरहून सुटली. यात साहिब, सिंध आणि सुलतान या तीन वाफेच्या इंजिनांनी १४ डबे ओढले होते. पहिली इलेक्ट्रिक ट्रेन: ३ फेब्रुवारी १९२५ रोजी मुंबई व्हीटी ते कुर्ला हार्बर दरम्यान पहिली इलेक्ट्रिक रेल्वे सेवा सुरू झाली. सुरुवातीच्या बोरिबंदर ते ठाणे या ३४ किमीच्या प्रवासानंतर, आज भारतीय रेल्वे हे जगातील सर्वात मोठ्या रेल्वे जाळ्यांपैकी एक आहे.

**मध्य रेल्वे :** ५ नोव्हेंबर १९५१ रोजी निझाम राज्य, शिंदे राज्य आणि धोलपूर रेल्वेच्या एकत्रीकरणातून मध्य रेल्वेची स्थापना झाली, जिचे मुख्यालय मुंबई आहे.

**आधुनिक प्रगती :** आज भारतीय रेल्वे वन्दे भारत सारख्या आधुनिक ट्रेन चालवत आहे आणि २०२६ पर्यंत ब्रॉडगेज नेटवर्कचे जवळजवळ पूर्ण विद्युतीकरण झाले आहे. भारतीय रेल्वे ही केवळ वाहतुकीचे साधन नसून ती भारताची आर्थिक आणि सामाजिक जीवनवाहिनी बनली आहे. २१ तोफांच्या सलामीने सुरु झालेली भारतीय रेल्वे आज जगातील चौथ्या क्रमांकाची आहे. भारतीय रेल्वेचे जाळे दुर्गम भागापर्यंत पोहोचले आहे. आज वन्दे भारत, नमो भारत या सोबतच बुलेट ट्रेनच्या दिशेने प्रवास सुरु आहे. आजचा हा दिवस ’भारतीय रेल्वे परिवहन दिवस’ म्हणून साजरा केला जातो.

ग. दि. माडगूळकर यांच्या कवितेत अजूनही मन रमून जाते.

झुक झुक झुक
झुक अगीनगाडी
धुरांच्या रेघा हवेत काढी
पळती झाडे पाहूया
मामाच्या गावाला जाऊया
मामाचा गाव मोठा
सोन्याचांदीच्या पेठा
शोभा पाहुन घेऊया

मामाची बायको गोरटी
म्हणेल कुठली पोरटी
भाच्यांची नावे सांगूया.....

मामाची बायको सुगरण
रोज रोज पोळी शिकरण
गुलाबजामुन खाऊया....

मामा मोठा तालेवार
रेशीम घेईल हजार वार
कोट विजारी लेऊया
मामाच्या गावाला जाऊया

**ग. दि. माडगूळकर**

# आपला मेंदू हेल्दी कसा ठेवावा ; याबद्दल काही टिप्स

मानवाला अनेक प्रकारच्या सवयी असतात. काही चांगल्या सवयी तर काही वाईट. चांगल्या सवयींमुळे माणूस तर चांगलाच राहतो परंतु काही वाईट सवयी अक्षरशः मेंदूची वाट लावत असतात. कारण त्या वाईट सवयी कामच तसं करत असतात. अशा काही वाईट गोष्टींबद्दल आपण माहिती पाहणार आहोत. आणि त्या टाळणे खूप गरजेचे आहे.

**१) अपुरी झोप**

झोपल्यानंतर मेंदूला विश्रांती मिळते. याशिवाय झोपेच्या वेळी मेंदू नवीन पेशी तयार करत असतो. मात्र जर आपण सात तासांपेक्षा कमी झोपलो तर नवीन पेशी तयार होत नाहीत. सोबतच झोपेच्या कमतरतेमुळे डिमेन्शिया, अलझायमर अशा आजारांचा धोकाही वाढतो. जर आपल्याला आपल्या मेंदूचे संरक्षण करायचे असेल तर रात्री किमान सात तासांची झोप घेणे गरजेचे आहे. आठ तास झोपणे हेही मेंदूसाठी चांगलेच आहे. अमेरिकेच्या न्यूरोलॉजी आणि वेलनेस सेंटरच्या मते - आपल्या मेंदूचे सर्वात जास्त नुकसान हे अपुऱ्या झोपी मुळे होते. प्रौढांसाठी पुरेशी झोप म्हणजे दिवसातील २४ तासांपैकी सात ते आठ तासांची झोप होय आणि रात्री सलग झोप घेणे तर चांगलेच.

**२) नाश्ता टाळणे**

रात्रभर न जेवल्यानंतर दिवसभर काम करण्याची ऊर्जा ही आपल्याला नाष्ट्या मधून मिळते. पण काहीजण कामासाठी किंवा इतर गोष्टींसाठी घाई करतात व नाश्त्यासारखी महत्त्वाची गोष्ट सोडून देतात. असे केल्यामुळे रक्तातील साखरेची पातळी कमी होते व त्यामुळे



मेंदूवरती परिणाम होऊ शकतो.

**३) पुरेसे पाणी न पिणे**

आपल्या मेंदूतील ७५ टक्के भाग हा पाण्याचा आहे. त्यामुळे आपण तहानलेले असलो की आपला मेंदू नीट काम करत नाही. तज्ज्ञांच्या मते - प्रौढ व्यक्तीने आपला मेंदू निरोगी ठेवण्यासाठी दिवसातून कमीत कमी दोन लिटर पाणी प्यायला हवे.

**४) दीर्घकाळ तणावात असणे**

खूप काळ तणावामुळे मेंदूच्या पेशी मरतात. आणि मेंदूचा पुढचा भाग हा आकुंचन पावतो. या गोष्टीचा आपल्या विचारशक्तीवरती व स्मरणशक्तीवरती परिणाम होतो. संशोधक म्हणतात की - जे लोक सतत कामात गुंतून राहतात व कोणत्याच कामाला नाही म्हणू शकत नाही अशा लोकांना सर्वात जास्त ताण सहन करावा लागतो. पण असे करणे ताबडतोब थांबवले पाहिजे. कोणत्याही प्रकारे अतिरिक्त तणाव घेणे टाळले पाहिजे.

**५) अंधारात जास्त वेळ घालवणे**

जास्त प्रकाश आणि हवेची हालचाल होत नसलेल्या अशा या वातावरणामुळे मेंदूवरती मोठा दबाव निर्माण होतो. कारण सूर्यप्रकाशाचा संपर्क आपल्या मेंदूसाठी खूप महत्त्वाचा असतो. नाहीतर मग निराशासारख्या काही समस्या उद्भवू शकतात. आपला मेंदू निरोगी ठेवण्यासाठी आपण दररोज उन्हात जाणे गरजेचे आहे. यासाठी बाहेर जायला हवे. जर तुम्ही घरी असाल तर दरवाजे व खिडक्या उघडे ठेवले पाहिजेत. आणि सकाळी लवकर उठण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**६) नकारात्मक विचार**

नकारात्मक विचारांमुळे तणाव, नैराश्य , चिंता निर्माण होते. म्हणून नकारात्मक विचार करणे टाळलेच पाहिजे. जर आपण असे वारंवार केले तर आपल्याला त्याची सवय लागेल. जर एकट्याने हे थांबवणे शक्य नसेल तर मानस उपचार तज्ञांची सुद्धा आपण मदत घेऊ शकतो. जे लोक आपली एनर्जी खाली आणतात अशा व्यक्तींपासून लांब राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**७) सतत एकटं राहणं**

लोकांमध्ये मिसळणे, लोकांसोबत गप्पा मारणे, राहणे हे आपल्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. एकटे राहिल्यामुळे पुरेशी झोप न मिळणे एवढाच वाईट परिणाम आपल्या मेंदू वरती होत असतो. मित्र-मैत्रिणी सोबत व घरातल्या व्यक्तीसोबत राहिल्यामुळे आपला मेंदू ताजातवाना राहतो.

**८) सतत हेडफोन वापरणे**

मोठमोठ्या आवाजात गाणे ऐकणे किंवा मोठ्या गोंगाटात जास्त वेळ राहिल्यामुळे ऐकण्याची क्षमता कमी होते. श्रवणशक्ती कमी झाली तर त्याचा थेट परिणाम आपल्या मेंदूवरती होतो. यामुळे अभ्यास करणे व लक्ष केंद्रित करणे कठीण होऊन जाते. हेडफोन वापरण्यापूर्वी व जास्त गोंगाटात राहण्यापूर्वी विचार करणे खूप गरजेचे आहे.

**९) गुगल सर्चचा अतिवापर**

आपल्याला किती फोन नंबर पाठ असतात? किती पत्ते किती संदर्भ आपल्याला तोंडपाठ असतात ? गुगल असल्यामुळे आपण सध्या गोष्टी लक्षात ठेवण्याचे कष्टच घेत नाहीत .आपण एखादी गोष्ट पटकन सर्च करतो, वापरतो आणि पुढे जातो. यामुळे आपली स्मरणशक्ती व विचारशक्ती दिवसेंदिवस कमकुवत होत चाललेली आहे. जर मेंदूला चालक ठेवायचे असेल तर इंटरनेटचा वापर टाळला पाहिजे व मेंदूला विचार करण्यास भाग पाडले पाहिजे.

**१०) जास्त खाण्याची सवय**

कितीही हेल्दी फूड असेल तरीही ते जास्त खाण्याची सवय ही मेंदूला हानिकारकच असते. संशोधनातून असे दिसून आले आहे की - जास्त खाल्ल्यामुळे मेंदूच्या धमन्यांमध्ये अडथळे निर्माण होतात. आणि रक्तप्रवाह कमी होतो. म्हणूनच मध्यम व योग्य आहार घेणे महत्त्वाचे मानले जाते.

**११) अतिरिक्त स्क्रीन टाईम**

जास्त स्क्रीन टाईमचा मेंदूच्या आकारावर व विकासावर मोठा परिणाम होतो. मोबाईल फोनच्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक फिल्डच्या दीर्घकाळ संपर्कात राहिल्याने डोकेदुखी, ब्रेन ट्यूमर यासारखे आजार होऊ शकतात. या कारणामुळेच मुलांचा स्क्रीन टाईम कमी केला पाहिजे. तसेच फोन रात्री झोपताना उशाशी व शरीराच्या अगदी जवळ ठेवून झोपणे टाळले पाहिजे.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## खम्मा खम्मा हो म्हारा रुणीछे राठ भजनांनी दुमदुमले अग्रसेन भवन

**अकोला :** लाखो भक्तांचे तारणहार रामसा पीर रामदेवबाबां यांचा संगीतमय जम्मा जागरण उत्सव स्थानीक अग्रसेन भवनात मोठ्या भक्तिभावात संपन्न झाला. यजमान दीपक तिवारी, गिरीधर तिवारी व मनिष तिवारी कुटुंबीयांच्या वतीने आयोजित या संगीतमय जम्मा जागरणात भजनकार व गायक राजेश सोमानी यांनी रामसा पीर रामदेवबाबांच्या पर्च्यांचे बखान केले. रामदेवबाबा हे राजस्थानच्या पोखरण येथील राजा अजमलजी यांच्या घरी ६८७ वर्षांपूर्वी प्रकट झालेले भगवान कृष्णाचे रूप आहेत. कलियुगातील वाढती सामाजिक विषमता, सामाजिक भेदभाव त्यांनी नष्ट करून सामाजिक सौहार्द प्रस्थापित करण्यासाठी भगवंत रामदेवबाबा रूपात अवतरले.

## दिव्यांग रोजगारासाठी दिव्यांग सोशल फाउंडेशनतर्फे कला प्रदर्शनाचे आयोजन



**अकोला:** स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोलाच्या माध्यमाने डॉ.विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात दिव्यांग रोजगारासाठी विविध सामाजिक उपक्रम संपूर्ण भारतभर राबवले जात आहे . दि. १८ व १९ एप्रिल २०२६ रोजी हॉटेल शगुन, जठारपेठ अकोला येथे वुमन एंट्रप्रेनर क्लब आयोजित प्रदर्शनात दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला चे कलादालन अकोले करांसाठी सकाळी १० ते रात्री १०पर्यंत उपलब्ध असणार आहे . या कलादालनात दिव्यांग बांधवांनी तयार केलेल्या पूजा साहित्य व शोभिवंत वस्तूंचे प्रदर्शन व विक्री उपलब्ध असून या उपक्रमातून मिळणारा निधी दिव्यांगांच्या शिक्षण, रोजगार व आरोग्यासाठी उपयोगात आणला जात असल्याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष अरविंद देव यांनी दिली आहे . ज्या दिव्यांग बांधवांना या उपक्रमात रोजगार मिळवायचा आहे.

## हिवरखेडला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी १६ एप्रिल



**हिवरखेड:** येथील नगरपरिषद मध्ये लाडू वितरीत करून नगराध्यक्ष, नगरसेवक, सभापती, पत्रकार, गावकरी यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. तसेच गावातील भीम नगरातील बौद्ध विहारात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना बौद्ध बांधवांच्या वतीने वंदना अर्पण करण्यात आली. यावेळी विविध पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

तसेच भीम ज्योत मंडळाचे नरेश बांगर, सुनील इंगळे, संतोष इंगळे, सचिन इंगळे, अनिल इंगळे, दिलीप घनबादूर, गावातील पोलिस पाटील, प्रकाश गावंडे , राजेश वानखडे, प्रदीप पाटील, सुरेश ओंकारे, शहजाद खान,,पत्रकार अर्जुन खिरोडकार, दीपक हिवराळे, भगत, यांच्यासह विशाखा महिला मंडळाच्या संगीता इंगळे, अनिता गवई, विमल दारोकार , पुष्पा घनबहादुर, मीना इंगळे,राणी इंगळे, अनिता इंगळे, यांच्यासह अनेक बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होत्या. तर गावातून भीम सैनिकांनी भव्य रेली व शोभायात्रा काढली.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती डाबकी रोड येथे साजरी

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अकोला:** स्थानिक डत्बकी रोड येथे भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी झाली. डत्बकी रोड उत्क्रांती मंडळ व उमेश जानोरकर पेंटर असोसिएशन च्या वतीने जुना शहर रेल्वे गेट ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान पर्यंत निघालेल्या रॅलीचे स्वागत ठआपला माणूसठ डॉ. अशोक ओळंबे, उमेश जानोरकर पेंटर, राम भारती, यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी शीतल पेय जल व सरबत वितरण शेकडो भिसैनिक,उपासक उपाशीका व नागरिकांना मंडळाच्या वतीने करण्यात आले. भव्य स्वरूपात संपन्न झालेल्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.




## प्रतिबंधित गुटखा वाहतूक करणाऱ्या आरोपीवर पोलिसांची कारवाई; १ लाखाचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १६ एप्रिल

**कुटासा:** किनखेड पुर्णा फाटा येथे नाकाबंदी दरम्यान एक संशयित इसम पांढऱ्या रंगाच्या स्कुटी वरून येताना आढळून आला. तपासणी केली असता त्याच्याकडे शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व सुगंधित तंबाखू आढळून आला. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन दहीहांडा येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

आरोपी नामे-रेहान शहा रफीक शहा, वय १९ वर्ष रा.



चोहोट्टा बाजार, ता. अकोट, जि. अकोला याचे कडून जप्त मुद्देमाल :विविधकंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू - रु.२७,५५०/- वाहतुकीसाठी वापरलेली स्कुटी (Suzuki Burgman) रु.८०,०००/- एकूण जप्त मुद्देमाल : रु. १,०७,५५०/- करण्यात आला. सदर कारवाई पोलीस अधीक्षक अचिंत चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी अकोट विभाग पाटील यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस स्टेशन दहीहांडा ठाणेदार पोलीस कर्मचारी यांनी केली. जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा व तंबाखू विक्री व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत पुढील काळातही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिस प्रशासनाने कळविले आहे.

## हिवरखेडच्या तापमानात वाढ, काळजी घेणे आवश्यक

प्रतिनिधी १६ एप्रिल

**हिवरखेड:** येथे उन्हाची तीव्रता अधिक वाढली असून सकाळी ९ वाजता पासूनच तापमान वाढत आहे. तसेच दुपारी अधिक तापमान असते. नागरिकांना बाहेर पडणे कठीण होत आहे. मोल मजुरी करणाऱ्यांना तर तारेवरची कसरत करावी लागत आहे.

बांधकाम मजुरांना वाढत्या तापमानाने जास्त फटका बसत आहे. शेती काम करणाऱ्या मजुरांना सुद्धा चांगलाच फटका बसत आहे. उन्हाचा पारा



वाढल्याने शरीरावर परिणाम होतो. भूक लागणे, नाश्ता कमी करणे, अस्वस्थ राहणे,ह्या इतर बाबी आपल्या अंगात निर्माण होतात. हे लक्षणे जरी असले तरी आपण पाणी पिणे अधिक वाढवावे. अधिक पाणी पिल्याने शरीरात अधिक ऊर्जा निर्माण होते. उन्हामध्ये आपल्या शरीराची काळजी घेणे फार गरजेचे आहे. यामध्ये लहान मुलांची काळजी घेणे अधिक आवश्यक आहे, तसेच आरोग्यदायी आयुर्वेदिक, घरगुती उपाय, कांदा, निबु ,आंबे, लोणचे, यांचे सेवन वाढविल्याने भूकीचे प्रमाण वाढते. पाणी उकळून थंड करून पिणे अधिक चांगले आहे. उन्हात दारू पिणे टाळावे असे तज्ञांचे मत आहे.

## मुरुमकार कुटुंबातील दोन विद्यार्थ्यांचे दहावी परीक्षेत उज्ज्वल यश

**अकोला :** जिद्द, मेहनत आणि उत्तम संस्कारांच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते, याचे उत्तम उदाहरण मुरुमकार कुटुंबाने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे.

सुप्रसिद्ध गायक सदानंद जनार्दनजी मुरुमकार यांची कन्या कु. स्वरा मुरुमकार हिने इयत्ता दहावीच्या परीक्षेत तब्बल ९५.२० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. ती नोव्हेल स्कूल अकोला ची विद्यार्थिनी आहे. तिच्या या यशामुळे परिसरात तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

तसेच संजय श्रीरामजी मुरुमकार यांचे चिरंजीव आनंद मुरुमकार यानेही इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९२ टक्के गुण मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. तो स्कूल ऑफ स्कॉलर अकोला चा विद्यार्थी आहे या दोन्ही विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे केवळ गुणांचे नसून त्यांच्या पालकांनी दिलेल्या संस्कारांचे, त्यागाचे आणि सातत्यपूर्ण मेहनतीचे फळ असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. स्वरा आणि आनंद यांच्या या यशामुळे मुरुमकार कुटुंबाचा मान उंचावला असून, नातेवाईक व मित्रपरिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

## मारवाडी युवा मंच, महिला मिडटाउन शाखेची नवनिर्वाचित कार्यकारिणी जाहीर

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अकोला:** मारवाडी युवा मंच अकोला महिला मिडटाउन शाखेचा पदग्रहण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. समाजसेविका सौ. मंजूदेवी गोयनका प्रमुख अतिथी होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थापिका अध्यक्षा सौ. रुची गुप्ता यांनी मंचाची उद्दिष्टे सांगितली. त्यानंतर निवर्तमान अध्यक्षा सौ. रूपाली कागलीवाल यांनी २०२५-२६ या यशस्वी कार्यकाळात राबवलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला.




नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. निधी मित्तल यांनी २०२६-२७ या वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची घोषणा करून औपचारिकपणे पदभार स्वीकारला.

सचिव प्रीती अग्रवाल, कोषाध्यक्ष नेहा अग्रवाल, उपाध्यक्षा मीनाक्षी अग्रवाल, प्रभा अग्रवाल, सह सचिव राधिका केजरीवाल, सह कोषाध्यक्षा पूनम गोयल, जनसंपर्क मंत्री पलक अग्रवाल, अर्चना अग्रवाल, अभिनंदन संदेश समिती प्राची अग्रवाल. कार्यकारिणी सदस्यांमध्ये नेहा खंडेलवाल, सुचिता अग्रवाल, रूपाली कागलीवाल, पूनम अग्रवाल, अर्चना डालमिया, प्रीती अग्रवाल, रूपाली रुंगटा, प्रीती भारूका, नीता मानसिंघा, नेहा सोनालवाला, प्रिया नरेडी, प्राची अग्रवाल, एकता भरगड, रवीता शर्मा, सारिका चिरानिया, खुशबू अग्रवाल, श्रद्धा चांडक, हेमल राठी, हर्षिल मुरारका, सोनाली खंडेलवाल, शीतल अग्रवाल आणि सपना मित्तल यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पलक अग्रवाल आणि नेहा अग्रवाल यांनी केले, तर आभार प्रदर्शन पूनम गोयनका यांनी केले.

## अवैध दारूविरोधात कारवाई; १ लाखाचा मुद्देमाल जप्त

वि. प्रतिनिधी १६ एप्रिल

### ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई

**अकोट:** ऑपरेशन प्रहार मोहिमेअंतर्गत अकोट ग्रामीण पोलिसांनी अवैध देशी दारू व हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरोधात मोठी कारवाई करत एकूण १ लाख १७ हजार ५२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी ५ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी पोलीस स्टेशन अकोट ग्रामीण हद्दीत पेट्रोलिंग दरम्यान गुप्त माहितीच्या आधारे विविध ठिकाणी छापेमारी करण्यात आली. या कारवाईत ग्राम पोपटखेड शेतशिवार येथे सुरू असलेल्या हातभट्टीवर धाड टाकून ९५,६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच ग्राम महागाव येथे १०,२०० रुपये, ग्राम वडाळी देशमुख येथे ४,३०० रुपये, ग्राम लोहारी येथे २,१०० रुपये आणि ग्राम उमरा येथे ५,२५० रुपयांचा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व सहायक पोलीस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार किशोर जुनघरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने ही यशस्वी मोहीम राबवली. या कारवाईमुळे परिसरातील अवैध दारू व्यवसायाला मोठा आळा बसणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

## महापौर, स्थायी समिती सभापतींचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अकोला:** अकोला महानगरपालिका कार्यालय येथे सम्राट अशोक ग्रुप आणि भारतीय कामगार सेना यांच्या व्दारे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये महापौर सौ.शारदा रणजीत खेडकर, मनपा आयुक्त डॉ.सुनील लहाने, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून पूजन करण्यात आले. यावेळी महिला व बाल कल्याण समिती सभापती सौ.आरती घोगलिया, नगरसेवक हरीश आलिमचंदानी, संतोष डोंगरे, नगरसेविका सौ.चंदा शर्मा यांची प्रामुख्याने



उपस्थिती होती. यावेळी मनपा उपायुक्त विजय पारतवार, महानगरपालिका सचिव अमोल डोईफोडे, शाम बगेरे, उमाकांत ढगवाले, संतोष नायडू, योगेश मारवाडी, सुनिल इंगळे, गणेश गावंडे, संजय चव्हाण, कृष्णा गेडाम, राजेंद्र देशमुख, हरिदास गजभिये, दिनेश सावंत, देवानंद तायडे, सुधाकर वानखडे, मोहन गायकवाड, सनी शिरसाट, नंदू बुलबुले, गणेश बुंदेले, विश्वनाथ सुतवणे यांचेसह ईतर कर्मचा-यांची उपस्थिती होती.

## सिंधी सेवा संगम ने साजरा केला दाल पकवान दिन

**अकोला:** विश्व सिंधी सेवा संगम, अकोला शाखेच्या वतीने दर महिन्याला सिंधी समाजातील पारंपरिक व प्रसिद्ध खाद्यपदार्थांचे आयोजन केले जाते.या उपक्रमांतर्गत नुकताच सिंधी समाजाचा दाल पकवान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.समाजात जानेवारी महिन्यात सेयल भाजी दिन, फेब्रुवारीत ताहिरी साई भाजी दिन, मार्चमध्ये मिठी चेहरी व चेहरी कोकी दिन, एप्रिलमध्ये दाल पकवान दिन, मे महिन्यात चाय शोला पेटीस दिन, जूनमध्ये सयु पटाटा दिन, जुलैमध्ये पकोडा दिन, ऑगस्टमध्ये पापड पाणी दिन, सप्टेंबरमध्ये बेसन भाजी फुलका दिन, ऑक्टोबरमध्ये मिठाई दिन, नोव्हेंबरमध्ये कढी चावल दिन व डिसेंबरमध्ये चहा कोकी दिन साजरे केले जातात.

**CLASSIFIED**

**अर्जंट पाहिजे**

१) सिक्युरिटी गार्ड १० पदे
१२ तास ड्युटी व ८ तास ड्युटी
२) हेल्पर पाहिजे २० पदे
३) पार्कमध्ये कामाकरिता लेडीज पाहिजे १० पदे

संपर्क: DSS मोती नगर मेन रोड अमरावती जय संतोषी किराणाच्या बाजूला, हरणे मार्केट

मो.9370030081
8421846450




## अर्बन स्पोर्ट टर्फ येथे सदस्यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अकोला:** बोधिसत्व, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आज सकाळी अर्बन स्पोर्ट टर्फ येथे उपस्थित सदस्यांनी वर्क आऊट पूर्वी डॉ. बाबासाहेबांना अभिवादन केले. त्यानंतर वर्क आऊटला सुरूवात केली. या प्रसंगी दिलीप गोपनारायण, रूपाली गोपनारायण, नितीन गोपनारायण, सुजाता गोपनारायण, रवींद्र धंदे, रमेश वानखडे, राजेंद्र भगत, अरुण वाघ, देवयानी वाघ, कांचन कुमार सावळे, संजय अंभोरे, अंजली अंभोरे, तेजस्विनी राठोड, डॉ. गुज्जलवार, मानकर मॅडम, बारमासे मॅडम,ढोरे मॅडम, संजय सोनोने,



सरिता सोनोने, प्रशिक सोनोने, श्रेया सोनोने, ध्रुव सोनोने, देवलाल सदनशिव, ताराचंद दुपारे, बाळासाहेब गवई, गजानन इंगळे, नंदू सराटे, छाया सदनशिव, नलिनी सदनशिव, नयना इंगळे, अनुजा इंगळे, स्वाती सराटे, सुषमा सदनशिव, आरती पातोडे, मंगलाबाई दंदे, ललिता बंदले, वर्षा पातोडे, राधिका खंदारे, योगिता शेगोकार, ललिता शिरसाठ, सुरेखा शिरसाठ, उर्मिला जाधव, बबिता ठोसरे, प्रज्ञा सोनोने, चंदा सोनोने, ताई सोनोने, प्रीती खडसे, हर्षु खडसे, योगिता रावडे, नेहा धवसे, प्रियंका गीते, ज्योती पिल्लेवार, शांताबाई गाडगे, कल्पना घुले, वैशाली आंबेकर, पूजा वर्गट, ज्योती भगत, संगीता भगत, साधना खिल्लारे, मंगला वानखडे, रिता सोनोने, अर्चना काजळे, स्वाती इंगोले, अंकुलाबाई राऊत, दिपाली शेठणे, वैशाली शिरसाठ, दीक्षा तायडे उपस्थित होत्या.

## स्वामी समर्थ केंद्रात पुण्यतिथी सप्ताह साजरा



प्रतिनिधी १६ एप्रिल

**हिवरखेड :** येथील स्थानिक संत गाडगे बाबा नगरातील श्री स्वामी समर्थ केंद्रात स्वामी गुरु चरित्र पारायण सप्ताह व महाराजांची १४८वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली, यावेळी ६५ सेवेकऱ्यांनी गुरु चरित्र पारायनाला हजेरी लावली.

तसेच महिला पुरुष भाविकांनी महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त दर्शनाचा व खिचडी प्रसादाचा लाभ घेतला.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

## यवतमाळ नगरपरिषदेतर्फे अग्निशमन सेवा सप्ताह

प्रतिनिधी १६ एप्रिल

**यवतमाळ :** अग्निशमन व आणीबाणी सेवा विभाग, नगरपरिषद यवतमाळ यांच्या वतीने दि. १४ ते २० एप्रिल या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. अग्निशमन सेवेत कार्य करताना प्राणाची आहुती देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ तसेच नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने हा सप्ताह दरवर्षी केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा केला जातो.गृह मंत्रालयाने दिलेले घोषवाक्य "सुरक्षित शाळा सुरक्षित रुग्णालय आणि अग्नी सुरक्षिततेसाठी जागरूक समाज आग प्रतिबंधकतेसाठी एकत्रपणे" या संकल्पनेवर आधारित विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

# उष्णतेचा तडाखा; दुपारी 12 ते 3 पर्यंत बाहेर जाणे टाळा

प्रतिनिधी १६ एप्रिल

**यवतमाळ :** जिल्ह्यात मागील चार ते पाच दिवसांपासून तापमानात लक्षणीय वाढ होत असून उष्णतेचा मानवी आरोग्यावर परिणाम होऊ नये यासाठी जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

उष्मघात टाळण्यासाठी 'काय करावे' व 'काय करू नये' याबाबत मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत. प्रशासनाच्या सूचनेनुसार, नागरिकांनी दुपारी १२ ते ३ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे. बाहेर जाताना छत्री, टोपी, गॉगलचा वापर करावा तसेच हलक्या रंगाचे सुती कपडे परिधान करावेत. दिवसभर पुरेसे पाणी पिणे, ओआरएस, ताक, लस्सी, लिंबूपाणी यांसारख्या पेयांचे सेवन करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.

**उष्मघात टाळण्यासाठी प्रशासनाचे आवाहन**

उन्हात काम करताना डोके व चेहरा ओल्या कपड्याने झाकणे, तसेच जड श्रम टाळणे गरजेचे आहे. मद्य, चहा, कॉफी व कार्बोनेटेड पेयांचे सेवन टाळावे तसेच शिळे अन्न खाणे टाळण्याचेही आवाहन करण्यात आले आहे. चक्कर येणे किंवा अस्वस्थ वाटल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. पशुधनाचीही काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले असून त्यांना सावलीत ठेवून पुरेसे पाणी देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उष्मघात झाल्यास संबंधित व्यक्तीला त्वरित थंड ठिकाणी हलवून शरीराचे तापमान कमी करण्याचे प्रयत्न करावेत. ओल्या कपड्याने अंग पुसणे,



ओआरएस किंवा घरगुती शीतपेय देणे आणि तातडीने जवळच्या आरोग्य केंद्रात दाखल करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. उष्णतेची लाट गंभीर ठरू शकते, त्यामुळे नागरिकांनी योग्य ती काळजी घेऊन स्वतःचे व कुटुंबाचे संरक्षण करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# महागावात दारू दुकानावरून 'आडवी-उभी' लढत; आजच होणार फैसला

प्रतिनिधी १६ एप्रिल

**महागाव :** शहरातील प्रभाग क्रमांक एकमधील देशी दारू दुकान हटवण्याच्या मुद्द्यावर आज महागावात 'आडवी बाटली' आणि 'उभी बाटली' असा थेट सामना रंगला आहे.

या प्रश्नावर नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता असून सकाळपासूनच मतदान केंद्रावर मतदारांची गर्दी पाहायला मिळत आहे. हे मतदान महागाव येथील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयात सुरू असून 'आडवी बाटली' (दारू दुकान बंद करण्याच्या बाजूने) आणि 'उभी बाटली' (दारू दुकान सुरू ठेवण्याच्या बाजूने) असे दोन गट आमने-सामने आले आहेत. दोन्ही गटांकडून जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात येत असून काही नगरसेवक व स्थानिक नेते उघडपणे बाजू घेत असल्याने वातावरण चांगलेच



तापले आहे.

सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया सुरू राहणार असून त्यानंतर तत्काळ मतमोजणी केली जाणार आहे. त्यामुळे आजच या वादाचा निकाल लागणार असल्याने संपूर्ण महागाव शहराचे लक्ष या निकालाकडे लागले आहे. दरम्यान, दुपारी दीड वाजेपर्यंत ४७ टक्के मतदान झाल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून देण्यात आली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला असून मतदान प्रक्रिया शांततेत पार पडत आहे. प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. वृत्त लिहेपर्यंत मतदान सुरू होते व निकाल जाहीर झालेला नव्हता. मात्र, 'आडवी' की 'उभी' याचा निर्णय आजच होणार असल्याने नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

# शस्त्रक्रियेदरम्यान मृत्यू प्रकरणी कुटुंबाला न्याय; १२.२४ लाखांची मदत

**राज्य मानवी हक्क आयोगाचे आदेश**

प्रतिनिधी १६ एप्रिल

**उमरखेड:** कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेदरम्यान मृत्यू झालेल्या महिलेच्या कुटुंबियांना अखेर न्याय मिळाला असून राज्य मानवी हक्क आयोगाच्या आदेशानुसार १२ लाख २४ हजार ७५० रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली. हा धनादेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मंदार पत्की यांच्या हस्ते संबंधित कुटुंबियांना प्रदान करण्यात आला. तालुक्यातील बारा येथील शारदा वाघू काळे यांना २०१७ साली कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी पुसद तालुक्यातील बेलोरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले होते. शस्त्रक्रियेदरम्यान अतिरक्तस्राव झाल्याने त्यांना तातडीने यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी सुरुवातीला जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडून दोन लाख रुपयांची मदत देण्यात आली होती. मात्र, कुटुंबाला न्याय मिळावा यासाठी तत्कालीन जि.प. सदस्य चितांगराव कदम यांनी पुढाकार घेत राज्य मानवी हक्क आयोगाकडे दाद मागण्यास मार्गदर्शन केले. सुमारे सहा ते सात वर्षे हे प्रकरण प्रलंबित राहिल्यानंतर आयोगाने नुकताच अंतिम निर्णय दिला. आयोगाच्या आदेशानुसार मंजूर रकमेपैकी मुलगी गायत्री व मुलगा अनिकेत यांच्या नावे प्रत्येकी ५ लाख ८७ हजार ३५० रुपये शिक्षण व भविष्यासाठी मुदतठेव (एफडी) स्वरूपात ठेवण्यात आले आहेत. तर कुटुंब प्रमुख वाघू काळे यांना ५० हजार रुपये देण्यात आले. ६ एप्रिल २०२६ रोजी यवतमाळ जिल्हा परिषद कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात हा धनादेश प्रदान करण्यात आला. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले, माजी जि.प. सदस्य चितांगराव कदम, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

# भाग्यश्री खानोदे ठरली 'यवतमाळ आयडॉल'ची मानकरी

प्रतिनिधी १६ एप्रिल

**यवतमाळ :** शहरातील 'समता पर्व-2026' अंतर्गत आयोजित 'यवतमाळ आयडॉल' या भव्य संगीत स्पर्धेचा सूरमयी समारोप सोमवारी (दि.13) पार पडला. नवोदित गायकांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आयोजित या स्पर्धेत भाग्यश्री पूर्णाजी खानोदे हिने आपल्या सुमधुर गायकीने प्रेक्षकांची मने जिंकत प्रथम क्रमांकावर आपले नाव कोरले.

या स्पर्धेत प्रेम परमेश्वर तेलंग (संभाजीनगर) याने द्वितीय, तर स्वरांगिनी कुडमेथे (यवतमाळ) हिने तृतीय क्रमांक पटकावून बाजी मारली. ग्रामीण आणि शहरी भागातील होतकरू कलावंतांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उदात्त हेतूने सामाजिक न्याय विभागाचे विद्यमान प्रधान सचिव



डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या कल्पनेतून हा स्तुत्य उपक्रम साकारला. गेल्या 22 वर्षांपासून यवतमाळच्या सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात क्रांती घडविणाऱ्या 'समता पर्वा'ने यंदा या स्पर्धेच्या माध्यमातून संगीत क्षेत्रात नवे चैतन्य निर्माण केले. 'हिऱ्याला पैलू पाडल्याशिवाय त्याची चमक दिसत नाही,' याच उक्तीप्रमाणे या स्पर्धेने जिल्ह्यातील अनेक गुणी गायकांना आपली कला सादर करण्याची मोठी संधी उपलब्ध करून दिली. दि. 9 ते 13 एप्रिल दरम्यान पार पडलेल्या या स्पर्धेत अनेक स्पर्धकांनी एकापेक्षा एक सरस गीते सादर केली. विशाखा खोब्रागडे, लावण्या वखरे, शुभम वीरुटकर, पवन नागपुरे आणि अंश फुलमाळी यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाची दखल घेत त्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. या सुरांच्या मैफलीत परीक्षक म्हणून तालमणी धीरेंद्र गावंडे आणि संगीत शिक्षिका शीला गायकवाड यांनी चोख जबाबदारी पार पाडली. या दिमाखदार सोहळ्याचे संचालन मुख्य संयोजिका काजल तायडे यांनी केले, तर मुख्य संयोजक म्हणून इंजि. धर्मपाल भितकर यांनी संपूर्ण धुरा सांभाळली.

# गरजूंना अन्नाचा आधार; यासिनलाला ठरतोय 'अन्नदाता'

प्रतिनिधी १६ एप्रिल

**आर्णी :** स्वतःच्या कुटुंबापुरतेच जगण्याच्या धावपळीत असलेल्या आजच्या काळात काही व्यक्ती समाजातील गरजू, वंचित घटकांसाठीही निःस्वार्थपणे काम करताना दिसतात. आर्णी येथील यासिनलाला हा असाच एक संवेदनशील तरुण असून, तो गरजूंना अन्नाचा आधार देत 'अन्नदाता' ठरत आहे. धान्य खरेदीचा स्वतःचा व्यवसाय सांभाळत असताना यासिनलाला सातत्याने गोरगरिब, गरजू व वंचितांना अन्नदान करत आहे. विशेष म्हणजे, हे कार्य करताना त्याने कधीही प्रसिद्धीचा हव्यास ठेवला नाही. ना फोटो, ना जाहिरात—निःशब्दपणे सेवा करण्याची त्याची भूमिका कायम राहिली आहे. भुकेल्याला अन्न आणि तहानलेल्याला पाणी देणे, ही संत गाडगेबाबांची शिकवण यासिनलालाने आपल्या कृतीतून जपली आहे. शहरातील अनेक सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोयही त्याने केली आहे. तसेच गरिबांच्या



विवाहासाठीही तो मदतीचा हात देतो, मात्र याची कुठेही जाहिरात करत नाही. मदत करताना जात-पात, धर्म असा कोणताही भेदभाव न करता तो सर्वांना समानतेने मदत करतो. "उपरवाल्याने मला या लायक बनवले आहे, त्यामुळे जेवढे शक्य आहे तेवढी मदत करतो. हे काही मोठे काम नाही," असे तो नम्रपणे सांगतो. आपल्या व्यवसायातून अनेकांना रोजगाराची संधीही उपलब्ध करून देत यासिनलाला समाजातील वंचित घटकांचा खरा आधार ठरत आहे. स्वार्थीपणाच्या युगात अशा निस्वार्थ सेवेमुळे समाजात सकारात्मकतेचा संदेश पसरत आहे.

# धावत्या ट्रकला लागली आग



प्रतिनिधी १६ एप्रिल

**यवतमाळ:** धामणगाव येथून यवतमाळकडे कुटार घेवून येणा-या ट्रकला आग लागली. या आगीत कुटार जळून खाक झाले असून, चार बंब पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली. ही घटना आज बुधवारी दुपारी ४.१५ वाजता मोहा फाट्याजवळ घडली. धामणगाव येथून एम.एच.३१ सि बी ०६४६ क्रमांकाचा ट्रक कुटार घेवून यवतमाळ कडे येत होता. अशातच मोहा फाट्याजवळ अचानक ट्रकला लाग लागली. ही बाब लक्षात येताच ट्रक उभा करून चालक खाली उतरला. या घटनेची माहिती अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या पथकाने चार बंब पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. आग विझविण्यासाठी अग्निशमन अधिकारी विनोद खरात, वाहन चालक प्रमोद तिडके, नितीन रहानडाले, नितीन जगताप, अनिल पिसाळकर, फायरमन अनुराग उरकुडे, सूरज राठोड, धिरज राठोड, सागर मडावी, उमेश बाजोरीया, रवी चौधरी यांनी प्रयत्न केले.

# यवतमाळ जिल्ह्यात ८१६ अन्न प्रक्रिया उद्योगांची उभारणी

प्रतिनिधी १६ एप्रिल

**यवतमाळ :** जिल्ह्यात कृषी आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी 'प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग' (पीएमएफएमई) योजना 'गेम चेंजर' ठरत आहे. सन २०२०-२१ ते २०२५-२६ या पाच वर्षांच्या कालावधीत जिल्ह्याने या योजनेत उल्लेखनिय प्रगती केली असून, आतापर्यंत ८१६ प्रकल्पांची यशस्वी उभारणी झाली आहे. विशेष म्हणजे, या उद्योगांच्या माध्यमातून जिल्ह्यात १९७२ नवीन रोजगार निर्माण झाले आहेत. या योजनेच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणाला गती दिली जात आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचे एकूण मूल्य २७४५ लाख रुपयांवर पोहोचले आहे. यामध्ये शासनाने खंबीर साथ देत आतापर्यंत १०५२ लाख रुपयांचे अनुदान थेट लाभार्थ्यांना देण्यात आले आहे. यामुळे ग्रामीण भागातील लघुउद्योजकांना हक्काचे भांडवल उपलब्ध झाले असून त्यांच्या आर्थिक सक्षमतेला शासनाचा आधार मिळाला आहे.

जिल्ह्यातील उद्योगांचे विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, स्थानिक उपलब्ध कच्च्या मालावर आधारित प्रक्रिया उद्योगांकडे युवकांचा आणि महिलांचा कल अधिक आहे. त्यामध्ये सर्वाधिक ४५८ मसाला उद्योग प्रकल्प कार्यान्वित असून त्यातून ९२३ जणांना रोजगार मिळाला आहे. ११५ गहू प्रक्रिया प्रकल्पांच्या माध्यमातून १८५ जणांच्या हाताला काम मिळाले आहे. जिल्ह्यात कडधान्यावर आधारित १०६ उद्योगातून २२६ जणांना रोजगार मिळाला आहे.

# भंडारी (ज) येथे बाबासाहेबांची जयंती; संविधान वाटपातून 'एक भारतीय'चा संदेश

प्रतिनिधी १६ एप्रिल

**आर्णी :** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भंडारी (ज) येथे सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट मंडळाच्या वतीने साध्या पण अर्थपूर्ण पद्धतीने जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी भारताचे संविधान (Constitution of India) हे पुस्तक गावातील नागरिकांना वाटप करून सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला. धर्म, जात, पंथ यांचा भेदभाव न करता आपण सर्वप्रथम भारतीय आहोत, ही भावना समाजात रुजविण्याचा प्रयत्न



या उपक्रमातून करण्यात आला. "फुलासारखी नाही, पण फुलाच्या पाकळीसारखी छोटीशी जयंती" अशा शब्दांत आयोजकांनी कार्यक्रमाचे स्वरूप मांडले. या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष सुरेश शिंदे, उपाध्यक्ष दिपक शिंदे, अनिल सोळंके, अंकुश शिंदे, गणेश शेगर, करन शिंदे, लखन शेगर, श्रीनाथ शिंदे तसेच इतर सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बहुजनांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी बाबासाहेबांचे विचारच मार्गदर्शक – कृष्णा पाटील देवसरकर

प्रतिनिधी १६ एप्रिल

**उमरखेड :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार हे बहुजन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी मार्गदर्शक आहेत. समाजातील मुलांनी शिक्षण घेऊन उच्च पद गाठावे आणि बाबासाहेबांचे विचार घरोघरी रुजवावेत, असे प्रतिपादन कृषी उत्पन्न बाजार समिती उमरखेडचे सभापती कृष्णा पाटील देवसरकर यांनी केले. वसंतनगर पोफाळी येथील बौद्ध विहारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त



आयोजित भीम जयंती उत्सवात ते बोलत होते.

या कार्यक्रमाचा उद्देश बहुजन समाजाला शिक्षण व विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी माजी जि.प. अध्यक्ष रमेशराव चव्हाण यांनीही विचार मांडताना, समानतेची बीजे कायद्याद्वारे पेरणारे बाबासाहेब हे महान समाजसुधारक होते, असे सांगितले. कार्यक्रमात महिलांच्या पुढाकारातून चिमुकल्यांनी इंग्रजी व मराठी भाषेत बाबासाहेबांवरील विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार विजयराव खडसे होते. यावेळी पंचशील ध्वजारोहण व त्रिशरण कार्यक्रम पार पडला. जाई कांबळे, दिव्या धुळे, साक्षी बरडे, स्मिता राठोड, समता बरडे, अनन्या कांबळे, ईशिता सावते, तन्वी सावते, मयंका पाईकराव, प्राप्ती गाडगे, सुजाता खंदारे, समीक्षा सावते, अनुश्री पाईकराव, भीमराव चंद्रवंशी आदी विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमास माजी जि.प. सदस्य शंकरराव तालंगकर, मुख्याध्यापक एन. बी. राठोड, राजेश क्षिरसागर, डॉ. फिरोज पठाण, संतोष क्षिरसागर, आनंदराव बरडे, वैभव वाकडे, बाळासाहेब खंदारे, महिला सदस्य ज्योती खंदारे, सविता घुगरे आदीं उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक नागरिक व विविध कुटुंबीयांनी परिश्रम घेतले.

# १४ दिवसांत ऊस बिल न दिल्यास व्याजासह वसुली – आ. वानखेडे यांचा कारखान्यांना इशारा

प्रतिनिधी १६ एप्रिल

**उमरखेड :** ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे ऊस बिल साखर कारखान्यांनी १४ दिवसांच्या आत देणे बंधनकारक असून, विलंब झाल्यास व्याजासह रक्कम द्यावी लागेल, असा कडक इशारा आमदार किसनराव वानखेडे यांनी दिला. उपविभागीय कार्यालयात १५ एप्रिल रोजी आयोजित आढावा बैठकीत त्यांनी ही भूमिका स्पष्ट केली.

उमरखेड व महागाव तालुक्यातील ऊस गाळप, दिलेली देयके व प्रलंबित रक्कम यांचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला. अनेक कारखान्यांनी शेतकऱ्यांचा ऊस गाळपासाठी घेतला असला तरी देयके अद्याप थकीत असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडल्याचे चित्र बैठकीत समोर आले. आमदार वानखेडे यांनी स्पष्ट केले की, साखर



आयुक्तालयाच्या नियमानुसार ऊस पुरवठ्यानंतर १४ दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करणे बंधनकारक आहे. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करून शेतकऱ्यांना व्याजासह रक्कम देण्यास भाग पाडले जाईल, असा इशारा त्यांनी दिला. गाळप हंगाम संपून दोन महिने उलटूनही अनेक शेतकऱ्यांना पैसे न मिळाल्याची गंभीर बाब त्यांनी अधोरेखित केली. शेतकऱ्यांबद्दल सकारात्मक भूमिका घेणे अत्यावश्यक असून, हा भाग शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जात असल्याने प्रश्न अधिक संवेदनशील असल्याचेही त्यांनी नमूद केले. बैठकीत विविध साखर कारखान्यांच्या प्रलंबित देयकांचा आढावा घेण्यात आला तसेच कारखानदारांच्या अडचणी व मागण्यांवर चर्चा झाली. भैरवनाथ सहकारी साखर कारखान्याचा प्रतिनिधी अनुपस्थित राहिल्याने नाराजी व्यक्त करत संबंधित कारखान्याला शो-कॉज नोटीस देण्याचे निर्देश देण्यात आले. या बैठकीस ऊस उत्पादक संघाचे अध्यक्ष डॉ. गणेश घोडेकर तसेच नॅचरल शुगर, सुभाष, शिऊर सहकारी साखर कारखाना, डेक्कन कारखाना आदींचे प्रतिनिधी उपस्थित होते. एप्रिलअखेरपर्यंत शेतकऱ्यांना एफआरपीप्रमाणे रक्कम अदा करण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

***नॅशनल शुगर कारखान्याचे आदर्श उदाहरण सवना येथील नॅशनल शुगर कारखान्याने शेतकऱ्यांप्रती सकारात्मक भूमिका घेत ऊसाचे शंभर टक्के देयक तातडीने अदा केले असून, शेतकऱ्यांचा सन्मान राखला आहे, अशी माहिती कारखान्याचे एमडी कदम यांनी बैठकीत दिली.***

## ९ मे रोजी राष्ट्रीय लोक अदालत

**अमरावती:** अमरावती जिल्ह्यातील सर्व न्यायालयात शनिवार, दि. ९ मे, २०२६ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात दाखल व दाखलपूर्व प्रकरणे तडजोड व सामंजस्याने निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येणार आहेत. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश आर. जी वाघमारे, तसेच सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे डी. एस. वमने, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या सुचनेनुसार राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोक अदालतीत सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाहीत. तडजोडपात्र प्रलंबित खटले राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ठेवण्यासाठी संबंधित न्यायालयात अर्ज करावा, तसेच दाखलपूर्व प्रकरणाबाबत नजिकच्या जिल्हा किंवा तालुका न्यायालयाकडे संपर्क साधावा.

# 45 सदस्यीय एसआयटीत तीन महिला अधिकारी

## ◆ एलसीबी, सायबरकडे 'स्वतंत्र' टीम म्हणून जबाबदारी, आयपीएस अधिकाऱ्याची नियुक्ती

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अमरावती :** तब्बल १८ अश्लील व्हिडीओ व ३९ आक्षेपार्ह छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल केल्याच्या प्रकरणाचा सखोल आणि जलद गतीने तपास करण्यासाठी पोलीस अधीक्षकांनी विशेष तपास पथकाची 'एसआयटी' स्थापना केली आहे. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता, यात एकूण ४५ अनुभवी पोलिस अधिकारी आणि अंमलदारांचा समावेश करण्यात आला आहे. यात प्रामुख्याने महिला सहायक पोलिस आयपीएस दर्जा असलेले अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात सदर चौकशी होणार आहे.

निरीक्षक प्रियंका भोयर व पोलिस उपनिरीक्षक स्नेहल आडे व वीणा पंडे यांचाही तपास पथकात समावेश आहे.




याप्रकरणी परतवाडा पोलिस ठाण्यात १३ एप्रिल रोजी रात्री पोलिस अंमलदाराच्या आरोपींवर बीएनएससह बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा 'पोस्को'चे कलम ८, १२ आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या प्रकरणासाठी जंबो एसआयटी गठित करण्यात आली आहे. आणि संवेदनशीलता पाहता, पारदर्शक तपासासाठी ही विशेष तुकडी तैनात करण्यात आली आहे. सहायक पोलिस अधीक्षक तथा अचलपूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी आयपीएस डॉ. शुभम कुमार यांची एसआयटीचे प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तपास अधिकारी असलेले परतवाड्याचे ठाणेदार पोलिस निरीक्षक सुरेश मस्के हेदेखील एसआयटीत आहेत.

### हे पोलिस अंमलदारही मुख्य भूमिकेत

◆अंमलदार दीपक राऊत, नीलेश काळे, पल्लवी खांडेकर, प्रवीण बाखडे, आशिष मुंडे, पवन ढोके, संदीप जुगनाके, शिवा शिरसाट, अजित राठोड, एलसीबीतील हवालदार सचिन मिश्रा, रवींद्र बावणे, बळवंत दाभणे, भूषण पेठे, पंकज फाटेंसह दिनेश राठोड, विनय राठोड, अमोल लवणकर, प्रभाकर बोदडे, शैलेश तिवारी, मंजू ढगे, शीतल वाकोडे, राजेंद्र कंकाळे, सारिका अठोर, सचिन होले, सुधीर राऊत, शुभम शर्मा, सचिन कोपणे, राहूल खरसान, पुरुषोत्तम बावनेर, श्रीकांत वाघ, नितीन कळमटे, सुचिता इंगळे, सुधा बेलसरे, सुधीर काळे, सचिन भोंबे व अक्षय मोहोड. तपास पूर्ण होईपर्यंत या पथकातील कोणत्याही सदस्याला इतर कामाची जबाबदारी दिली जाणार नाही. या प्रकरणाचा निकाल तातडीने लागावा, यासाठी हे पथक दररोजच्या तपासाचा अहवाल वरिष्ठांना सादर करतिल.

### एसआयटीत यांचा समावेश

◆विशेष तपास पथक प्रमुख डॉ. शुभम कुमार, तपास अधिकारी तथा परतवाड्याचे ठाणेदार सुरेश मस्के, एलसीबी प्रमुख किरण वानखडे, सायबर पोलिस ठाण्याचे प्रमुख अशोक लांडे यांच्यासह सहायक पोलिस निरीक्षक अनूप वाकडे, गौतम इंगळे, भरोसा सेलच्या प्रमुख सहायक पोलिस निरीक्षक प्रियंका भोयर, सायबरमधील एपीआय संतोष गुर्जर, चांदूर रेल्वे व परतवाडा ठाण्यातील पीएसआय वीणा पंडे व स्नेहल आडे व स्थानिक गुन्हे शाखेतील पीएसआय सागर हटवार यांचा समावेश आहे. यातील स्थानिक गुन्हे शाखाप्रमुख व सायबर ठाणेप्रमुख स्वतंत्र टिम म्हणून काम करणार असल्याची माहिती एसपी विशाल आनंद यांनी बुधवारी माध्यमांना दिली.

## सातरगावात 'एचपीव्ही' लसीकरण विशेष सत्र उत्साहात

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अमरावती:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सातरगाव येथे मुलींमधील गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग रोखण्यानाठी 'एचपीव्ही' नभीकरण विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले. दाभा उपकेंद्र अंतर्गत गावातील ७ पात्र लाभार्थी मुलींनी लसीकरणाचा लाभ घेतला. भविष्यात होणाऱ्या कर्क रोगाला आळा घालण्यासाठी ही लस अत्यंत प्रभावी आणि फायदेशीर असल्याचे मत यावेळी उपस्थित पालकांनी व्यक्त केले. लसीकरणापूर्वी लाभार्थी पालकांचे समुपदेशन करण्यात आले. यासाठी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. प्रियंका धानुका, आरोग्य सेवक राजेंद्र चकुले, अभिनव विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुजा ब्राम्हणे यांचे सहाकार्य लाभले. मोहिमेसाठी आरोग्य सहायिका अनिता मुळे, गटप्रवर्तिका अनिता मेश्राम. साधना भेंडे, राजेश डिबे आणि मनोज धरपाळ यांनी परिश्रम घेतले. तसेच आशा स्वयंसेविका संध्या ठाकरे, विना शेजवे आणि सिंधू कलसाईत यांचे सहकार्य लाभले. लसीकरणानंतर सर्व लाभार्थी मुलींना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे व वैद्यकीय अधिकारी डॉ. राजीव धोत्रे वाच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

## जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचे उद्घाटन

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अमरावती:** जलसंपदा विभागातर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२६चे उद्घाटन नुकताच उर्ध्व वर्धा कॉलनीतील मनोरंजन सभागृहामध्ये पार पडला. जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता ज. द. टाले अध्यक्षस्थानी होते.

यावेळी अधीक्षक अभियंता योगेश दाभाडे, अधिक्षक अभियंता मनिष राजभोज उपस्थित होते. कार्यकारी अभियंता अनिकेत सावंत यांनी या पंधरवड्यामध्ये जलसंपदा विभागाने करावयाच्या कामामध्ये कालवा स्वच्छता मोहिम, पाणीपट्टी वसुली, पाणी वापर संस्थांचे सक्षमीकरण, महानगरपालिका व ग्रामपंचायत क्षेत्रातील प्रत्यक्ष पाणी वापराचा जललेखा तयार करणे, अनधिकृत बांधकाम हटविणे, तसेच जलसंपदा विभागाच्या जमिनीच्या मालमत्तांचे स्थळ निश्चिती करणे, जलसंपदा अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण, स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, शेतकरी, पाणी वापर संस्था चर्चासत्र ही कामे प्राधान्यक्रमाने करण्याबाबतचे नियोजन सादर केले. यावेळी उर्ध्व वर्धा, सपन, चंद्रभागा, शाहनुर, पुर्णा या प्रमुख नद्यांचे जलपुजन करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. सहायक अभियंता श्रध्दा कथलकर यांनी सूत्रसंचालन केले. विवेक चव्हाण यांनी आभार मानले.

# दहा हजार हौद जळकुंडाची होणार सोय

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अमरावती :** आ.रवि राणा यांच्या निर्देशानुसार संपूर्ण शहरात, प्रभागा-प्रभागात, छत्री तलाव परीसरात व अमरावती जिजिल्हा शहर व ग्रामीण तसेच मेळघाट येथे युवा स्वाभिमान पार्टीच्यावतीने तसेच युवा स्वाभिमान पार्टीच्या सर्व नगरसेवकांच्या कडुन जागो-जागी १० हजार हौद जलकुंडाची होणार सोय होणार आहे.

यामध्ये बर्ड फिडर तसेच गो माता इतर पाळीव प्राणी तसेच हरीण, कावीळ व इतर वन्यजीव प्राण्यांना पाणी पिण्याकरीता पाण्याचे टाके केली तयार

युवा स्वाभिमान पार्टीचा

### ◆ आमदार रवी राणा यांचा पुढाकार



अभिनव उपक्रम राबविण्यात येणार आहे. जिल्हयात वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे पक्षी, जनावरे व वन्यजीवांना पाण्याची मोठी टंचाई भासत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रवि राणा यांच्या निर्देशानुसार संपूर्ण अमरावती जिल्हयात शहर व ग्रामीण तसेच मेळघाट येथे युवा स्वाभिमान पार्टीतर्फे एक अभिनव व समाजोपयोगी उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या उपक्रमाअंतर्गत शहरातील प्रत्येक प्रभागात, छत्री तलाव व अमरावती जिल्हा शहर व ग्रामीण तसेच मेळघाट परिसरात एकूण सुमारे १० हजार जलकुंड (पाण्याचे टाके) उभारण्याची योजना राबविण्यात येत आहे. या माध्यमातून पक्षी, गोमाता, पाळीव प्राणी तसेच विविध हरीण, कावीळ व इतर वन्यजीवांना उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

युवा स्वाभिमान पार्टीच्या सर्व नगरसेवकांकडून त्यांच्या-त्यांच्या प्रभागात जागोजागी हौद जलकुंड ठेवण्याचे काम सुरू झाले असून, काही ठिकाणी बर्ड फिडरही बसविण्यात आले आहेत. त्यामुळे पक्ष्यांना अन्न व पाणी दोन्ही मिळणार असून पर्यावरण संवर्धनालाही हातभार लागणार आहे. या उपक्रमामुळे जिल्हयात नागरिकांमध्येही समाधान व्यक्त करण्यात येत असून, समाजातील इतर घटकांनीही अशा प्रकारच्या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर



**धारणी:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धारणी येथील बुद्धविहारात बाबासाहेबांना अभिवादन करून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी बुद्धविहारात बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अनुयायांनी कृतज्ञ अभिवादन केले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने अनुयायी, नागरिक व युवक सहभागी झाले होते. विशेष म्हणजे, या रक्तदान शिबिरात अनेक महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून सामाजिक कार्यात आपली महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. त्यांच्या सहभागामुळे शिबिराला अधिक प्रेरणादायी स्वरूप प्राप्त झाले. रक्तदान शिबिरात अनेकांनी स्वेच्छेने रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी व्यक्त केली. उपस्थितांनी बाबासाहेबांच्या विचारांचा जागर करत समाजसेवेचा संदेश दिला. संपूर्ण कार्यक्रम उत्साह, सामाजिक जाणीव व एकोप्याच्या वातावरणात पार पडला.

## महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांची विविध ठिकाणी पाहणी

### ◆ स्वच्छता, नालेसफाई व अतिक्रमणावर कडक कारवाईचे निर्देश

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अमरावती:** शहरातील स्वच्छता व नागरी सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त वर्षा लड्डा यांनी आज शहरातील विविध भागांची पाहणी करून संबंधित विभागांना समन्वय राखत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

आयुक्तांनी पंचवटी चौक, गाडगेनगर, नवसारी, आराधना स्पॉट तसेच इतवारा बाजार या प्रमुख व गर्दीच्या भागांना भेट देत स्वच्छतेची स्थिती तपासली. या ठिकाणी साचलेला कचरा, नाल्यांची साफसफाई, रस्त्यांची देखभाल व सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता यांचा त्यांनी बारकाईने आढावा घेतला. काही ठिकाणी आढळलेल्या



त्रुटींवर नाराजी व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ सुधारात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी जबाबदारीने काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हॉकर्स व दुकानदारांकडून रस्त्यावर कचरा टाकला जात असल्याबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. कचरा डस्टबिनमध्ये जमा करून तो नियमितपणे घंटागाडीमार्फतच देणे अनिवार्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच घंटागाडीचे नियोजन काटेकोरपणे करून ती वेळेवर व नियमितपणे फिरावी, यासाठीही सूचना देण्यात आल्या.

इतवारा बाजार परिसरातील सर्व दुकानदारांना त्यांनी स्पष्ट निर्देश दिले की, प्रत्येकाने आपले सामान केवळ निर्धारित दुकानाच्या मर्यादेतच ठेवावे. रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करू नये तसेच नाल्यांमध्ये कचरा टाकू नये. परिसर स्वच्छ व सुंदर राखण्यासाठी व्यापाऱ्यांनी सक्रिय सहकार्य करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. यानंतर अर्जुन नगर येथील उद्यानाची पाहणी करत त्यांनी स्वच्छता, हरित क्षेत्र, तसेच नागरिकांसाठी उपलब्ध सोयी-सुविधांचा आढावा घेतला. उद्यानात येणाऱ्या नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व आनंददायी वातावरण मिळावे यासाठी आवश्यक दुरुस्त्या व सुधारणा तातडीने करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

# केंद्र शासनाने लागू केलेली इंडो यूएस ट्रेड डील काँग्रेसतर्फे रद्द करण्याची मागणी

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अमरावती :** शेतकरी विरोधी केंद्र शासनाने इंडो-यूएस ट्रेड डील लागू केली आहे. जी भारतातील शेतकऱ्यांना भविष्यात घातक असून ती रद्द करण्याचा मागणी करिता देशभरात साखळी सत्याग्रह सुरु आहे, त्याचाच भाग म्हणून अमरावती जिल्हा युवक कॉंग्रेस च्या वतीने सत्याग्रह चा आजचा सातवा दिवस शेतकरी विरोधी INDUS ट्रेड डील रद्द करण्यात यावी या मागणी करिता युवक कॉंग्रेस ने जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन केले व निवेदन दिले.



संपूर्ण देशात INDO US ट्रेड डील आहे या विरोधात अमरावती डील रद्द करण्याबाबत सरकार च्या विरोधात शेतकारयांच्या हितार्थ युवक कॉंग्रेस च्या वतीने सत्याग्रह सुरु आहे ती रद्द व्हावी ही आमची मागनी आहे शेतकर्यांच्या पाठीत खंजीर खुपसन्याच काम हे सरकार करत आहे अतिशय घातक हे ट्रेड डील आहे या विरोधात अमरावती जिल्हा युवक कॉंग्रेस ने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिल

यावेळी युवक कॉंग्रेस पदाधिकारी युवक कॉंग्रेस अमरावती जिल्हाध्यक्ष राहुल येवले, मेलघाट विधानसभा अध्यक्ष, पियूष मालवीय, तालुका अध्यक्ष चिखलदारा संदीप मुंढे, राजेन्द्र कासडेकर, धनराज आठोले, पंकज अमोदे, अक्षय घुमावरे, चिंटू झाड़खंडे सह सर्व युवक पादधिकारी उपस्थित होते..!!

शेतकरी विरोधी सरकार ने लागू केलेली ट्रेड डील रद्द करावी, शासनाने शेतकऱ्यांच्या विरोधात निर्णय घेणे बंद करावे. हा निर्णय जागतिक पातळीवर एप्स्टीन फ़ाइल मध्ये नाव आल्या मुळे नरेंदर सरेंडर झाले व त्यामूळेच असे निर्णय घेत आहेत जो पर्यन्त ही डील रद्द होणार नाही तोपर्यंत देशभरात युवक कांग्रेस आंदोलन करणार आहे.

अशी राहुल येवले जिल्ह्याध्यक्ष, अमरावती जिल्ह्य युवक कांग्रेस यांनी दिली.

## पीडीएमसी दवाखान्यातील प्रसाधनगृहाचे लवकरच लोकार्पण...

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अमरावती :** पीडीएमसी प्रभाग क्रमांक दोन मधील पीडीएमसी दवाखान्यामध्ये गेल्या अनेक वर्षापासून बांधण्यात आलेले सुलभ शौचालय हे बंद आहे. दवाखान्यातील रुग्णांसाठी तसेच पंचवटी चौकामधून बाहेरगावी जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशांसाठी हे सुलभ शौचालय बंद असल्यामुळे खूप अडचणी येत होत्या. महिला व मुलींची कुचंबना होत होती. त्या परिसरातील नागरिकांची नेहमी तक्रार होती. की हे शौचालय बांधून पूर्ण असून सुद्धा जनतेसाठी का खुलं करण्यात येत नाही तेव्हा प्रभागाच्या नगरसेविका सुरेखा लुंगारे यांनी आम सभेत या संदर्भात प्रश्न मांडला . व महापौर श्रीचंद



तेजवानी यांच्या शी चर्चा केली. आज महापौर श्रीचंद तेजवानी यांनी तातडीने आपल्या चेंबरमध्ये संबंधित अधिकारी व कॉन्ट्रॅक्टरची बैठक बोलावली व पीडीएमसी दवाखान्यात प्रत्यक्ष जाऊन शौचालयाची पाहणी केली. सिटी इंजिनिअर पवार साहेब इंजिनियर राजेश आगरकर तसेच पीडीएमसी चे डीन देशमुख सर व कत्राटदार प्रदीप पाटील यांच्याशी चर्चा करून ज्या काही समस्या ,अडचणी होत्या त्या दूर केल्या. व येत्या काही दिवसात लवकरच हे सुलभ शौचालय रुग्णांसाठी व जनतेसाठी खुले करावे असे स्पष्ट निर्देश दिले. यावेळी गेल्या अनेक वर्षापासून बंद असलेले सुलभ शौचालय महापौर साहेबांच्या पुढाकारामुळे लवकरच सुरू होणार व नागरिकांना पायाभूत सुविधा प्राप्त होईल यासाठी प्रभागाच्या नगरसेविका सुरेखा लुंगारे यांनी महापौर यांचे आभार मानले.

## प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेत जिल्हा दुसरा

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अमरावती:** प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेत सन २०२५-२६ या वर्षात जिल्ह्यात ३६५ प्रकल्पांना कर्ज मंजुरी मिळाली आहे. प्रकल्प मंजुरीत जिल्ह्याने राज्यात दुसरा क्रमांक पटकाविला आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना ही असंघटित व अनोंदणीकृत अन्न प्रक्रिया उद्योगासाठी शासनाने सुरू केली आहे. यातून शेतीमाल उद्योगासाठी वैयक्तिक आणि गट लाभार्थ्यांस १० लाखांच्या मर्यादेत भांडवली गुंतवणुकीच्या ३५ टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जात आहे.

असंघटित अन्नप्रक्रिया क्षेत्रामधील समस्या दूर करण्यात येत आहे. ज्यामध्ये संबंधित उद्योजक बाहेरून कर्ज घेण्यास पात्र नाहीत. वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यासाठी लागणारा जास्तीचा खर्च व मानांकनाचा अभाव असतो. यावर




सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी केंद्र पुरस्कृत आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेला केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे. यात केंद्राचा ६०, तर राज्याचा ४० टक्के हिस्सा असणार आहे.

तांत्रिक ज्ञान, कौशल्याधारित प्रशिक्षण आणि इतर पायाभूत सुविधा देऊन असंघटित क्षेत्रात सूक्ष्म उद्योजकांची क्षमता बांधणी करणे, अस्तित्वातील उद्योगाच्या पतमर्यादा वाढविणे, सार्वजनिक पायाभूत सुविधा उपलब्ध करणे व एफपीओ, बचतगट, सहकारी संस्था यांना पायाभूत सोईसुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. त्यासाठी प्रक्रिया सुरु झाली आहे. योजनेसाठी दि. ३१ मार्च २०२६ अखेर ऑनलाइन प्रणालीवर ९५७ पात्र अर्ज प्राप्त झाले. यापैकी ८९२ अर्ज बँकेकडे सादर करण्यात आले. बँकेकडे सादर अर्जांपैकी ३६५ प्रस्तावास १७कोटी ९८ लाख कर्ज मंजूर झाले. यातील १७९ लाभार्थ्यांना ११ कोटी ५३ लाख बँकेद्वारे कर्ज वितरीत करण्यात आले. यातील ५० पेक्षा अधिक कर्ज खात्यात १ कोटी ५० लाखांचेवर अनुदान जमा झाले आहे. योजनेसाठी शेतकरी उत्पादक संस्था, बचतगट, सहकारी संस्था व वैयक्तिक लाभार्थी अर्ज करू शकतात.

## जुळे शहरवासीय आक्रमक, एसपी कार्यालयात धडक



**छावणीचे स्वरूप : अतिरिक्त पोलिस कुमक, आ. तायडे यांचे नेतृत्व**

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अमरावती :** अचलपूर आणि परतवाडा परिसरात मुली, महिलांचे लैंगिक शोषण करून त्यांचे अश्लील व्हिडिओ प्रसारित करणाऱ्या अयान अहमद याच्या कुकृत्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार व त्याच्या साथीदारांवर कठोर कारवाईच्या मागणीसाठी बुधवारी आमदार प्रवीण तायडे आणि भाजपचे राज्य प्रवक्ते शिवराय कुलकर्णी यांच्या नेतृत्वात अचलपूर व परतवाडा या जुळ्या शहरातील सकल हिंदू समाजातील शेकडोंनी पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांची भेट घेतली.

त्यांच्याकडे कारवाईची आग्रही मागणी केली. बुधवारी दुपारी दोनच्या सुमारास अचलपूर आणि परतवाडा येथून शेकडो हिंदू बांधत मोठ्या संख्येने एसपी कार्यालयावर धडकले. आरोपींची धिंड काढा आणि पीडितांना न्याय द्या. अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

६

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि १६ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त रॅली काढून महामानवास मानवंदना!

**वाशीम :** महामानव विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण महिला असंघटीत कामगार व कर्मचारी सेनेच्या महिलांची बाईक रॅली काढून महामानवास अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र नवनिर्माण महिला असंघटीत कामगार/ कर्मचारी सेनेच्या राज्य अध्यक्षा संगीता चव्हाण यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेल्या या रॅलीची सुरुवात सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून करुन पाटणी चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे बुध्द वंदना घेतल्यानंतर अभिवादन व मानवंदना देवून रॅलीचा समारोप केला. डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानिक हक्कांची आणि महिला सक्षमीकरणाची जाणीव करुन देणे हा या रॅलीचा मुख्य उद्देश होता. असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांनी एकत्र येऊन सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात आपले स्थान निर्माण करावे हा संदेश या रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला.



# जिल्ह्यात नदीपात्रातून अवैध रेती उत्खनन !

## *शासनाचे उत्पन्न बुडवून वाढीव दराने रेतीचा पुरवठा * घरकूलासाठी रेती मिळेना

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात रेती घाटाचे लिलाव झालेले नाही. बांधकाम करणाऱ्यांना छुप्या मार्गाने वाढीव दराने रेतीचा पुरवठा केल्या जात आहे. जिल्ह्यात रेतीचे अवैध उत्खनन करून वाहतुक करणारे रेती माफीया शासनाचे उत्पन्न बुडवित असल्याचे दिसून येते. मात्र घरकूलसाठी रेती मिळत नसल्यामुळे घरकूले बांधकाम रखडले आहे. दुसरीकडे रेती तस्करी मोठ्या प्रमाणात सुरू आहे. रेती तस्कऱ्यांनी नदीपात्रात ट्रक्टर उतरविण्यासाठी छुप्या मार्गाने रस्ते तयार केले आहेत. याकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे.





जिल्ह्यात पैनगंगा नदीपात्रासह इतर छोट्या मोठ्या नदी नाल्यातून रेतीचे अवैध उत्खनन राजरोसपणे सुरू आहे. हे उत्खनन स्थानिक तलाठी मंडळ अधिकारी तहसीलदार व पोलिसांसमोर होत असल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात रेती घाटाचे लिलाव झालेले नाही. बांधकाम करणाऱ्यांना छुप्या मार्गाने वाढीव दराने रेतीचा पुरवठा केल्या जात आहे. जिल्ह्यात रेतीचे अवैध उत्खनन करून वाहतुक करणारे रेती माफिया शासनाचे उत्पन्न बुडवित असल्याचे दिसून येत आहे. रेती तस्कऱ्यांनी नदीपात्रारात ट्रक्टर उतरविण्यासाठी रस्ते तयार केले आहेत. अवैध रेतीचासाठी करून दामदुप्पट भावाने विकत असतात. नदीपात्रातून हजारो ब्रास रेतीचे अवैध उत्खनन चोरी सर्रासपणे सुरू आहे. विशेष म्हणजे रात्रीच्या वेळी बिना क्रमांकाच्या ट्रक्टर व ट्रॉलीने ही वाहतुक केली जात आहे. विशेष म्हणजे परिसरातील खासगी व शासकीय बांधकामांनाही अधिकारी व पोलिसांच्या समोर रेतीचा पुरवठा केल्या जात आहे. नदी घाट म्हणजे रेती माफियांसाठी तस्करांचे कुरन बनले आहे. जिल्ह्यात रेती माफियांची मोठी टोळी असून अधिकाऱ्यांच्या संगणमतानेच हा व्यवसाय सुरू आहे. सर्व प्रमुख मार्गावरून रेतीची वाहतुक सुरू असून अधिकारी फक्त बघ्याची भूमीका घेत आहे. दुसरीकडे सर्व सामान्यांच्या घरकुलासाठी व शौचालयासाठी रेती उपलब्ध होत नसल्याने घरकुलाचे काम अपुर्ण राहीले आहे.

### दोन अधिकाऱ्यांवर झाले हल्ले

मे २०२१ मध्ये रिसोड तालुक्यातील अवैध रेती वाहतुकीवर कारवाईसाठी गेलेल्या तहसीलदार व तलाठी यांच्यावर रेती माफीयांनी हल्ला केला तर कारंजा येथे कारंजा येथील अधिकाऱ्यांवर रेती माफीयांनी धक्का बुक्की केली. त्यामुळे अधिकारी दहशती मध्ये आहे. यासाठी जिल्ह्यातील अवैध रेती वाहतूक बंद करून त्याच्यावर कारवाई करण्याची मागणीचे वृत्त सिटीन्यूज़ सुपरफास्टने प्रकाशित केले होते या वृत्ताची दखल घेऊन पोलिसांनी कारवाई केली होती. आता काही महिन्यानंतर पुन्हा वाळुमाफियांनी पुन्हा अवैध रेती उपसा सुरू केला आहे. त्यामुळे हा उपसा बंद करावा अशी मागणी होत आहे.




## थोडक्यात

### उद्या केनवड येथे महसूल समाधान शिबीर

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

उद्या दि. १७ एप्रिल २०२६ -तहसील कार्यालय रिसोड यांच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर – टप्पा क्र. १' चे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर दि. १७एप्रिल २०२६ रोजी जि. प. शाळा, केनवड येथे होणार आहे. या शिबिरात महसूल विभागाच्या विविध सेवा एकाच ठिकाणी व एकाच दिवशी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामध्ये प्रलंबित फेरफार प्रकरणांचा निपटारा, सातबारा व ८-अ उतारे, विविध प्रमाणपत्रे, सामाजिक योजनांचे लाभ, विद्यार्थ्यांसाठी दाखले, तुकडेबंदी प्रकरणे, पाणंद रस्त्यांच्या मान्यता, घरपट्टे वाटप, ई-मोजणी अर्ज, ॲग्रीस्टॅक व पीएम किसान नोंदणी तसेच भूसंपादन व अकृषिक नोंदी अद्ययावत करण्याची कामे केली जाणार आहेत. या शिबिराचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन तहसील कार्यालय रिसोड यांनी केले आहे.

### धुम्रपान विरोधी कायदा नावापुरताच

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शाळा - महाविद्यालयापासून १०० मीटर अंतरापर्यंत कोणत्याही तंबाखूजन्य पदार्थाची विक्री करु नये असे आदेश असतांना शहरातील शाळा, व महाविद्यालय परिसरत काही फुटाच्या अंतरावर पानटपऱ्या दिसत आहेत. या पानटपऱ्यावर सिगारेट, गुटखा, तंबाखु पदार्थाची खुलेआम विक्री होत आहे. शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी सुट्टीच्या काळात पानटपऱ्यावर जाऊन गुटखा चघळतात तर काही शौकीन स्मोकींग करतांना सुध्दा दिसतात. पानटपऱ्या व्यतिरिक्त शाळा, महाविद्यालयालगत चहा टपऱ्यावर देखील अशा प्रकारच्या पदार्थाची विक्री होत आहे.



### राजे छत्रपती ब्लड डोनर ग्रुपच्यावतीने मान्यवरांचे सत्कार व पाणी वाटप



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे येणाऱ्या मिरवणुकीचे स्वागत करुन मंडळाचे अध्यक्ष व मान्यवरांचा राजे छत्रपती ब्लड डोनर ग्रृपच्यावतीने सत्कार करुन मिरवणूकीत सहभागी समाजबांधव व नागरिकांना पाणी वाटप करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गिरधारीलाल सारडा, मोहन नखाते, डॉ. सिद्धार्थ देवळे, बांधकाम सभापती राहुल तुपसांडे, आशिष इंगोले, राम ठेंगडे, संजय डवरे, कृणाल डबले, दिलीप भेंडेकर, दीपक ढगे व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अजय मोतीवार, प्रतीक कांबळे, भूषण देशपांडे, संध्याताई सभादिंडे, ओमप्रकाश फड, अमोल भेंडेकर, मंगेश वानखेडे, हरीश सभादिंडे, उबेर पठाण, किसनराव धोटे यांनी अथक परिश्रम घेतले.

## तलाठी गावात येईना; शहरात सज्जा सापडेना !

### रिसोड तालुक्यातील स्थिती: शेतकऱ्यांची भटकंती, महसूल कामे खोळंबली...

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

शेतकरी आणि महसूल विभाग यामधील तलाठी हा दुवा समजला जातो. शेती आणि शेतकऱ्यांना विविध कामासाठी तलाठी कार्यालयाच्या उंबरठ्यावर गेल्याशिवाय पर्याय नसतो. त्यामुळे शेतकरी तलाठ्याकडे विविध शेती कामासाठी जात आहेत. मात्र, तलाठी मुख्यालयी न राहता तालुक्याच्या ठिकाणी राहत असून, अप डाऊन करीत असल्यामुळे त्याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. परिणामी शेती कामे खोळंबत आहेत.

मुख्यालयाची एलर्जी असलेले अनेक तलाठी शहरात कोणी घरी, तर कोणी किरायाच्या खोलीत बसून सज्जाचा कारभार करत आहेत. नेमून झालेल्या ठिकाणी सज्जा शोधूनही सापडत नाही अन्न ठरवूनही दिलेल्या गावात तलाठी पोहोचत नाही.




अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भूदंडासह मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे नाराजी व्यक्त होत आहे. काही तलाठ्यापैकी अपवाद वगळता एकही तलाठी गावात कर्तव्य बजावत नसल्यामुळे महसूल कामे खोळंबली आहेत. आठ आठ दिवस तलाठी गावाकडे फिरकत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. बहुतास तलाठ्याकडून शहरात सज्जा थाटले असून, त्या ठिकाणी मिनी तलाठी ठेवले आहेत. नेमणूक झालेल्या ठिकाणी सज्जा शोधूनही सापडत नाही. ठरवून दिलेल्या गावात तलाठी पोहोचत नाहीत. ग्रामस्थांनी दूरध्वनीवरून संपर्क केल्यास आपण सज्जा अंतर्गत येणाऱ्या दुसऱ्या गावात असल्याचे कारण सांगितले जाते.

**काही तलाठी नेहमीच नॉट रिचेबल...**

काही तलाठ्यांचे दूरध्वनी क्रमांक बंद आहेत. तर काहींचे नेहमीच नॉट रिचेबल' असतात, तलाठ्यांच्या अशा बेजबाबदार वागण्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. दस्ताची, गहाणखताची फेरफार नोंद करताना कुणाच्या नोंदी वेळेवर होतील. याचा भरवसा राहिला नाही. दरम्यान अनेक तलाठी यांनी आपले खाजगी व्यक्ती नेमले आहेत. त्यांच्याकडूनच संपूर्ण काम करून घेतले जात आहे..

**अधिकाऱ्यांनाही जुमानेनात...**

वरिष्ठ अधिकारीही याकडे साप दुर्लक्ष करत आहेत. अनेक तलाठी अनेक दिवस सापडत नाहीत. त्यांनी नेमलेल्या व्यक्तीकडून शेतकऱ्यांना कामे करून घ्यावी लागत आहे. अधिकाऱ्यांनाही काही दबंग तलाठी विचारत नसल्याची चर्चा आहे..

**सोयीनुसार प्रकरणांचा निपटारा...**

एकीकडे महसूल विभागाकडून पारदर्शकता, तात्परतेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. मात्र, तरीही तलाठी, मंडळ अधिकारी आपल्या सोयीनुसार प्रकरणे निपटारा करण्यासाठी प्राधान्य देत असतात..

## शेतातील मशागतीच्या कामांना वेग

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

खरिप हंगामासाठी जिल्ह्यात शेतकरी सज्ज झालाअसुन पेरणीपुर्व शेत मशागतीच्या कामांना वेग आला आहे. यंदा मजुरांना अभाव असुन मजुरीचे दर वाढल्याने आधुनिक यंत्रांच्या सहाय्याने कामे उरकण्याकडे शेतक-यांचा अधिक कल दिसुन येत आहे. दरवर्षी ७ जुन पासुन मृग नक्षत्र सुरु होते. तत्पुर्वी शेती पेरणीयोग्य करुण पावसाची प्रतिक्षा केली जाते.

समाधानकारक पाउस झाला की पेरणीच्या कामांना गती मिळते. यावर्षी एकीकडे मजुरीचे दर वाढले असतांना दुसरीकडे मागेल तेवढी मजुरी देउनही मजुर मिळेनासे झाले आहेत. त्यामुळेच शेतक-यांनी ट्रॅक्टरव्दारे शेतीची





नांगरणीव वखरणीची कामे हाती घेतली आहेत. गतवर्षी सोयाबीन व तुरीचे पिकापासुन अपेक्षीत उत्पादन मिळाले नाही. सोबतच कपाशिच्या उत्पन्नातही घट झाली.

हा तोटा दुर करण्यासाठी ओलीताची सोय असलेल्या शेतक-यांनी गव्हाची पेरणी केली होती. बहुतांश शेतक-यांनी उन्हाळी भुईमुंग व कांद्याच्या सिड्स प्लॉटची लागवड केली. लग्न सराईमुळे मशागतीच्या कामांना सवड मिळणार नसल्याने बहुतांश कोरडवाहु शेतक-यांनी नांगरणी व वखरणी कामांना प्रारंभ केला आहे. पावसाळा सुरु व्हायला अद्याप काही महिन्याचा कालावधी शिल्लक असला तरी सर्वत्र पेरणीपुर्व मशागतीच्या कामात मात्र वेग आला आहे. काळानुरुप शेती यांत्रिकी पध्दतीने करण्यावर जोर आहे. बैलाच्या वाढत्या किमंती व दिवसेंदिवस चा-यांची वाढती टंचाई लक्षात घेउन मशगतीसाठी बैलाऐवजी ट्रॅक्टरसारख्या यंत्राचा वापर करत आहेत. यामुळे बैलजोडयाही नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

## शतकोटी वृक्षलागवड योजनेचा बोजवारा



● सिटी न्युज ब्युरो @ मानोरा ●

मानोरा पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या बहुतांश ग्रामपंचायतीमध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत शतकोटी वृक्षलागवड योजना कार्यान्वित करण्यात आली परंतु बऱ्याच ठिकाणी ही योजना कागदोपत्रीच पूर्ण न करता केवळ कागदोपत्री उद्दिष्ट पूर्ण दाखवून लाखो रुपयाचा निधी हडप केल्याचे चित्र आहे. त्यामुळे या योजनेचा पुरता बोजवारा उडाला आहे.

परंतु अनेक ग्रामपंचायतीनी शासनाच्या उद्देशाला हरताळ फासून योजनेत अनियमितता आणली प्रथमदर्शी अंत्यत पारदर्शक वाटणाऱ्या मग्रारोहयो नही मोठ्या प्रमाणात गौडबंगाल दिसून आले. सार्वजनिक बांधकाम विभाग, सामाजिक वनिकरण तसेच ग्रामपंचायती यांना वृक्षलागवड करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले. त्यात सामाजिक वनिकरणाचे काम बऱ्या प्रमाणता दिसून येते.

### पिंप्री (सरहद्द) येथे भीम जयंती उत्साहात साजरी;

## सामाजिक एकतेचा घुमला संदेश





● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

केनवड जवळील पिंप्री सरहद्द येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त गावात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. सामाजिक एकता, बंधुता आणि समतेचा संदेश देणाऱ्या या जयंती सोहळ्याने संपूर्ण गाव एकत्र आल्याचे प्रेरणादायी चित्र निर्माण केले. जयंतीनिमित्त सकाळपासूनच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भव्य मिरवणुकीला प्रारंभ झाला. गावातील प्रमुख रस्त्यांवरून काढण्यात आलेल्या या मिरवणुकीत ध्वनिक्षेपकाच्या तालावर 'जय भीम'च्या घोषणांनी वातावरण दणाणून गेले होते. महीला मुली लहान थोर मंडळीसह युवकांच्या उत्स्फूर्त नृत्याने सोहळ्याला विशेष रंगत आणली.

या मिरवणुकीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक सलोख्याचे दर्शन. मिरवणूक ज्या-ज्या वस्तीतून गेली, त्या त्या ठिकाणी त्या समाजाच्या संस्कृतीचा आदर राखत गाणी वाजवण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज आणि संत सावता माळी यांच्यावरील गीतांद्वारे समानता व ऐक्याचा संदेश देण्यात आला. त्यामुळे सर्व समाजघटकांमध्ये आपुलकी, सन्मान आणि एकोप्याची भावना अधिक दृढ झाल्याचे दिसून आले. मिरवणुकीत लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी मोठ्या

### शिरपूर पोलीस स्टेशन कडून बंदोबस्त

उत्साहाने सहभाग घेतला. चिमुकल्यांच्या हातात निळे झेंडे, महिलांचा उत्साही सहभाग आणि तरुणांची जोशपूर्ण उपस्थिती यामुळे मिरवणूक अधिकच आकर्षक ठरली. अनेकांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत सोहळ्याची शोभा वाढवली. ही मिरवणूक बाबासाहेबांच्या पुतळ्यापासून सुरू होऊन गावातील प्रमुख मार्ग, मशिदीसमोर, विठ्ठल मंदिरासमोर तसेच माळी वेटाळ परिसरातून मार्गक्रमण करत ठरलेल्या ठिकाणी शांततेत संपन्न झाली. बुद्ध बांधवांनी अत्यंत शिस्तबद्ध व शांततापूर्ण पद्धतीने हा सोहळा पार पाडला. गावकऱ्यांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून या मिरवणुकीचा आनंद घेतला. या जयंती सोहळ्यातून बाबासाहेबांच्या शिक्षण, समता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा प्रसार करण्यात आला. गावातील विविध सामाजिक कार्यकर्ते, युवक मंडळे आणि नागरिकांनी एकत्र येत हा कार्यक्रम यशस्वी केला. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी शिरपूर पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. एकंदरीत, पिंप्री सरहद्द येथे साजरी झालेली भीम जयंती ही केवळ उत्सवापुरती मर्यादित न राहता सामाजिक ऐक्य, बंधुता आणि समतेचा संदेश देणारी ठरली. विविध समाजघटकांनी दाखवलेला एकोपा इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

### पंकजपाल महाराजांच्या समाज प्रबोधनपर किर्तनाने श्रोते मंत्रमुग्ध...

# महापुरुषांच्या विचारांचा जागर आणि मनोरंजनाचा तडका !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांचा १९९ वा जयंती उत्सव तसेच द्विशताब्दी जन्मोत्सवी वर्षानिमित्त आयोजित प्रबोधन कार्यक्रमात प्रख्यात आधुनिक किर्तनकार पंकजपाल महाराज यांनी समाज जीवनातील सर्वच बाबींवर प्रकाश टाकत आपल्या प्रभावी आणि प्रबोधनात्मक किर्तनातून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाच्या पहिल्या दिवशी दि. १० एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक परिसर येथे सत्यपाल महाराज यांचे शिष्य असलेले आधुनिक किर्तनकार पंकजपाल



महाराज, रुई गोस्ता यांच्या किर्तनाचा कार्यक्रम पार पडला. सर्वप्रथम पंकजपाल महाराज यांच्या हस्ते फुले स्मारकाला हारार्पण करण्यात आले. यावेळी बालरोगतज्ञ डॉ. विजय कानडे यांनी पंकजपाल महाराज व त्यांच्या ग्रुपचा फुले दाम्पत्यांची प्रतिमा आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी किर्तनातून पंकजपाल महाराज यांनी व्यसनाधीनता, बुवाबाजी, अंधश्रद्धा, महिलांचे प्रश्न, शिक्षण प्रश्न, बेरोजगारी, येणाऱ्या पिढीवरील संस्कार आदी विषयांवर विविध दाखले देऊन मार्मिक शब्दांमध्ये प्रबोधन केले. आपल्याला जन्म देणाऱ्या आई-वडिलांची प्रत्येक मुलाने वृद्धापकाळात काळजी घ्यावी.

**सुनेने सुद्धा आपल्या सासूला आईप्रमाणे सांभाळावे.**

आजचा युवक व्यसनाधीनतेकडे वळत आहे. व्यसनामुळे आयुष्य बरबाद होते. त्यामुळे वेळीच व्यसनाला आवर घालावा असा संदेश त्यांनी उदाहरण उदाहरणे देऊन दिला. येणारा काळ हा प्रचंड स्पर्धेचा काळ आहे. या स्पर्धेत टिकण्यासाठी आजच्या युवकांनी प्रचंड मेहनत घ्यावी. स्पर्धा परीक्षांची कास धरावी. तसेच उद्योग, व्यवसायाकडे वळावे. लहान मुलांना मोबाईल पासून दूर ठेवावे आणि त्यांच्यावर चांगले संस्कार द्यावे. महापुरुष व संतांच्या विचारांनी आपल्याला न्याय, हक्क मिळवून दिले आहेत. त्यामुळे त्यांच्या विचारांची सातत्याने जाणीव ठेवावी. असे आवाहन पंकजपाल महाराज यांनी केले. आपल्या मनोरंजनात्मक किर्तनाच्या शैलीतून पंकजपाल महाराज यांनी तब्बल दोन तास श्रोत्यांना खिळवून ठेवत प्रभावी कीर्तन केले. या कीर्तनासाठी शहरासह गाव खेड्यातूनही शेकडो श्रोते उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मंगेश भुताडे व योगेश ऊलेमाले यांनी केले. किरणताई गिऱ्हे यांनी पंकजपाल महाराज यांचा परिचय करून दिला. तर प्रा. अनिल मडके यांनी उपस्थितांचे

**क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या उपक्रमाची जिल्हाभर चर्चा.**

आभार मानले. यावेळी आपल्या विशेष कलेच्या सादरीकरणामुळे राज्यासह देशभरात नावलौकिक मिळविलेल्या श्री संत सावता माळी व्यायाम प्रसारक मंडळ, वाशिम च्या रणचंडिका ग्रुपचा विशेष सत्कार करण्यात आला. या ग्रुपचे गुरुवर्य अंबादास महाराज इंगोले, राजूभाऊ राऊत, दामोदर इंगोले, केशवभाऊ इंगोले, प्रवीण राऊत आदींना फुले दांपत्याची प्रतिमा आणि शाल व पुष्पगुच्छ देऊन पंकजपाल महाराज यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला शेकडोच्या संख्येने श्रोते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उत्सव समितीच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## लोणार उपकेंद्रालगत आग; दोन तास वीजपुरवठा खंडित, मोठी दुर्घटना टळली!

**लोणार :** शहरातील वीजपुरवठ्याचा कणा असलेल्या उपकेंद्रा (सबस्टेशन) लगतच्या पट्ट्यात मंगळवारी दुपारी अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. दुपारी १२ वाजताच्या सुमारास ही - घटना घडली. माहिती मिळताच विद्युत विभागाचे कर्मचारी व आपत्कालीन यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली आणि शर्थीच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात आली. प्राथमिक माहितीनुसार, उपकेंद्र परिसरात - साचलेले वाळलेले गवत व कचरा यामुळे आग भडकली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, आग वेळेत नियंत्रणात आली नसती तर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. दरम्यान, या घटनेमुळे लोणार शहराचा सुमारे दोन तास वीजपुरवठा खंडित झाला. अचानक वीज खंडित झाल्याने व्यापारी वर्गाचे मोठे हाल झाले. दुकाने, लघुउद्योग आणि दैनंदिन व्यवहार ठप्प झाल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागला.विद्युत विभागाकडून दरवर्षी देखभालीसाठी खर्च केल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात स्वच्छतेचा अभाव आहे.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीत आंदोलन



## सचिवांच्या आश्वासनानंतरही आंदोलन सुरूच

प्रतिनिधी १६ एप्रिल

**मलकापूर :** मलकापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गेल्या अनेक दिवसापासून पासून शेतकऱ्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. शेतकऱ्यांसाठी बनवलेल्या शेडमध्ये व्यापारांचा माल बरेच दिवसापासून पडून असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांचा माल शेडच्या बाहेर टाकावा लागत होता. तसेच परस्पर होणारे आणि उभ्या ट्रॅक्टर मध्ये होणाऱ्या हराशी साठी सुद्धा हमाली आणि तोलाइ ही शेतकऱ्यांना भरावी लागत होती. तसेच व्यापाऱ्यांच्या फळीवर माल गेल्यानंतर ट्रॅक्टरची अतिरिक्त भाडे सुद्धा शेतकऱ्यांना द्यावे लागत होते.

यासंदर्भातली माहिती शेतकऱ्यांनी फोन करून बुलढाणा जिल्हा किसान काँग्रेस चे जिल्हाध्यक्ष संभाजी शिर्के,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष निलेश नारखेडे,क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमोल राऊत यांच्या कानावर घातल्यानंतर त्यांनी तात्काळ कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये धाव घेऊन जोपर्यंत शेतकऱ्याच्या सर्व समस्या वर लेखी तोडगा निघणार नाही तोपर्यंत कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कोणत्याही प्रकारचं काम होऊ देणार नाही अश्या आक्रमक पद्धतीचा पवित्र घेतला. त्यानंतर मालाची खराशी बंद झाली व सर्व शेतकरी आंदोलनामध्ये सहभागी झाले. शेतकऱ्यांनी मलकापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव ढोले साहेब यांना घेराव घालत जाब विचारायला सुरुवात केली. त्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव यांनी शेतकऱ्यांनी केलेल्या विविध मागण्याच्या संदर्भामध्ये लेखी आश्वासन देत यावर उद्यापासून त्वरित कारवाई केली जाईल अशा पद्धतीची ग्वाही दिली.व तसे पत्र आंदोलकांना दिले. सदर पत्रामध्ये १)परस्पर ट्रॅक्टर खाली न करता हराशी होणाऱ्या शेतकऱ्यांना हमाली व तोलाई लागणार नाही.२) शेडमध्ये असलेला व्यापारांचा माल दोन दिवसात खाली करून पूर्ण शेड शेतकऱ्यांना मोकळ करून दिल जाईल. ३) अडत्याच्या फळीवर माल नेऊन दिल्यास त्याचे ट्रॅक्टर भाडे खरिदार देतील. ४) शेतकऱ्यांना पाणी आणि स्वच्छतागृहाची व्यवस्था करून दिला जाईल. अश्या पद्धतीने शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचे लेखी आश्वसन देण्यात आले. त्यानंतर शेतकरी एकजुटीचा विजय असो जय जवान जय किसान चे नारे देत शेतकऱ्यांनी जल्लोष केला व शेतकरी नेत्यांचे आभार मानले यावेळी लेखी पत्रामध्ये दिलेल्या आश्वासनांची पूर्तता झाली नाही आणि या संदर्भात कुठलीही समस्या शेतकऱ्यांना असल्यास तुम्ही आमच्याशी संपर्क करा. असे आव्हाहन करण्यात आले यावेळी बोलताना किसान काँग्रेस जिल्हध्यक्ष संभाजी शिर्के यांनी आपण सर्व शेतकरी म्हणून एकजुटीने लढले आणि आज मिळालेले लेखी आश्वासन हे त्याचे फलित आहे म्हणून भविष्य सुद्धा शेतकऱ्यांनी आपल्या समस्यासाठी एकजूट होणे गरजेचे आहे. अशा पद्धतीने आपणास लेखी आश्वासनात मिळालेल्या विषयाची पूर्तता कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी न केल्यास त्यासाठी पुन्हा आपल्या सर्व शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून आंदोलन करू असे मनोगत व्यक्त केले. या आंदोलन प्रसंगी बुलढाणा जिल्हा किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संभाजी शिर्के यांचे सह . स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हध्यक्ष निलेश नारखेडे,बाळू ठाकरे, गोपाल सातव,तसेच क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमोल राऊत, सचिन शिंगोटे, हनुमान भगत, यांचे सह सुनील संभारे,अनंता चोपडे आशिष मालठाणे,दीपक चोपडे अनेक शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सौर कृषी पंप तक्रार निवारणासाठी महावितरणचा पुढाकार

### शेतकऱ्यांनी मेळाव्यात सहभागी व्हावे - सुरेंद्र कटके

प्रतिनिधी १६ एप्रिल

**बुलढाणा :** सौर कृषी पंपां बाबत येणाऱ्या विविध तक्रारींचे निराकरण करण्यासाठी महावितरण, बुलढाणा जिल्ह्याच्या वतीने विशेष तक्रार निवारण मेळाव्यां चे आयोजन करण्यात आले आहे. उपविभाग निहाय होणाऱ्या या मेळाव्याचा लाभ तक्रार किंवा समस्या असलेल्या शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन अधीक्षक अभियंता सुरेंद्र कटके यांनी केले आहे. वीज ग्राहकांना अखंड व सुरळीत सेवा देण्याच्या दृष्टीने महावितरण सतत प्रयत्नशील असून, सौर कृषी पंपांशी संबंधित समस्या नोंदवून शक्य असल्यास त्या जागेवरच सोडविण्याचा उद्देश या मेळाव्याचा आहे. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांचे व शंकांचे निरसनही यावेळी करण्यात येणार आहे. या मेळाव्यात महावितरणचे अभियंते व तांत्रिक कर्मचारी यांच्यासह सौर कृषीपंप बसविणाऱ्या संबंधित एजन्सींचे प्रतिनिधीही उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे तक्रारींचे तात्काळ व प्रभावी निराकरण होण्यास मदत होणार आहे.

शेतकऱ्यांच्या सोयीसाठी मेळाव्यांचे आयोजन त्यांच्या परिसरातच करण्यात आले आहे. संबंधित उपविभागीय कार्यालयात सकाळी ११ वाजता मेळाव्यास सुरुवात होणार असून तक्रार असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या उपविभागीय कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.१६ एप्रिल रोजी बुलढाणा, देऊळगाव राजा, १७ एप्रिल चिखली, उदयनगर, संग्रामपूर येथे २० एप्रिल नांदुरा, खामगाव, धाड, खामगाव ग्रामीण- १ व २, सिंदखेड राजा येथे, २१ एप्रिलला खामगाव शहर, शेगाव, लोणार, मेहकर येथे, २२ एप्रिलला जळगाव जामोद, मोताळा, मलकापूर येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. महावितरणने सर्व संबंधित शेतकऱ्यांनी या मेळाव्याला उपस्थित राहून आपल्या तक्रारी मांडाव्यात व त्यांचे निराकरण करून घ्यावे, असे आवाहन केले आहे.

## कूल बुलढाणा झाले हॉट; तापमान 42.4 अंश

प्रतिनिधी १६ एप्रिल

**खामगाव :** थंड हवेसाठी ओळख असलेल्या बुलढाण्या चे तापमान दिवसेंदिवस चढत असून, बुधवारी कमाल तापमानाने ४२.४ अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला. एप्रिल महिन्यात २०१९ नंतर प्रथमच इतके उच्च तापमान नोंदविले गेल्याने नागरिकांना उकाड्याचा तीव्र त्रास सहन करावा लागत आहे.

गेल्या तीन दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत असून, अनुक्रमे ४१.५, ४१.६ आणि बुधवारी ४२.४ अंश सेल्सिअस अशी नोंद झाली आहे. २९ एप्रिल २०१९ रोजी जिल्ह्यात ४४ अंश सेल्सिअस तापमान नोंदविले गेले होते. त्यानंतरचे हे सर्वाधिक तापमान असल्याचा अंदाज व्यक्त केला जातश्आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे २,१९० फूट उंचीवर वसलेले बुलढाणा हे शहर पूर्वी 'थंड हवेचे ठिकाण' म्हणून प्रसिद्ध होते; मात्र गेल्या दोन दशकांत शहराचा चेहरामोहरा झपाट्याने बदलला. काँक्रीटची वाढती बांधकामे. रस्त्यांच्या रुंदीकरणात पिंपळासारखी मोठी वृक्षसंपदा आणि हरित आच्छादनाचा झालेला हास यामुळे तापमानात सातत्याने वाढ होत असल्याचे जाणकारांचे मत आहे. बुलढाणा पूर्वी थंड हवेसाठी ओळखले जात होते; वाढते काँक्रीटीकरण, वृक्षतोड आणि हरित आच्छादनाचा ऱ्हास यामुळे शहराचा नैसर्गिक समतोल बिघडला. परिणामी, तापमानाचा पारा वर्षागणिक चढत असून 'थंड हवेचे शहर' ही ओळख आता धूसर होत चालल्याची खंत व्यक्त होत आहे.

## डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत शर्विलला गोल्ड मेडल; वाढवला जिल्ह्याचा मान



प्रतिनिधी १६ एप्रिल

**जळगाव जामोद :** राष्ट्रीय स्तरावर झालेल्या डॉक्टर होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेच्या दिनांक १२ एप्रिल २०२६ ला झालेल्या बक्षीस समारंभात शर्विल अनिल भगत ने गोल्ड मेडल मिळवत जिल्ह्याची मान उंचावली आहे. सदर स्पर्धेचा बक्षीस समारंभ दिनांक १२ एप्रिल २०२६ ला रविवारी यशवंत नाट्य मंदिर , मुंबई येथे डॉ. मधुबाला चिंचाळकर, डॉक्टर अशोक नगरकर यांच्या उपस्थितीत पार पडला. पोलार वूमन ऑफ इंडिया या पुरस्काराने सन्मानित मुंबईच्या प्रसिद्ध भूलतज्ञ डॉक्टर मधुबाला चिंचाळकर यांच्या हस्ते शर्विल ला बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावर वर्ग सहावी करिता डॉक्टर होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा होत असते. चार फेजमध्ये होणाऱ्या या स्पर्धेत भारतातील एकूण एक लाख ४ हजार ८५ विद्यार्थी सहभागी झाले होते. एमसीक्यू परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा ,शोधनिबंध आणि मुलाखत या चार पायऱ्या पार करत शेवटी ४२९ विद्यार्थी निवडले गेले. त्यापैकी चि. शर्विल ने गोल्ड मेडल मिळवत रोख पारितोषिक सुद्धा मिळवले .

स्थानिक दि न्यु इरा हायस्कूल चा चि. शर्विल मेडल मिळवणारा पहिला विद्यार्थी ठरला आहे . त्यामुळे सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन होत आहे. या स्पर्धेकरिता शर्विल ला शाळेचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी सर, वर्गशिक्षक पुरुषोत्तम बचे सर, माजी प्राचार्य डॉ.सुहास उदापुरकर सर (अकोला ), राजमती ठेंग मॅडम (बुलढाणा ) यांनी मार्गदर्शन केले.

## विद्यार्थ्यांकडून हजारो बियांचे संकलन

**खामगांव :** स्थानिक टिळक राष्ट्रीय विद्यालयाचे मधुसुदन गाडोदीया, झुंझुनुवाल, सस्थाध्यक्ष अशोकभाऊ विद्यमान सुधाकर अजबे, उपाध्यक्ष सुरेश पारीक, कोषाध्यक्ष उमेश अग्रवाल, विश्वस्त रमेश दाणे यांच्या 'आपल्याच परिसरातील बी, आपलीच रोपवाटीका व आपचेच संगोपण' या आवाहनाला प्रतिसाद देत वर्ग ६ वी चे वर्ग शिक्षक हरित सेनाप्रमुख व छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार प्राप्त उपक्रमशील शिक्षक अरुण भगत व विद्यार्थी यांनी मुख्याध्यापक पातुर्डे गुरूजी यांच्या मार्गदर्शनामध्ये क्रांतीसुर्य महात्मा जोतिराव फुले यांची १९९ वी व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंतीनिमित्त शालेय परिसरातील अमलताश च्या हजारो बीयांचे संकलन १३ एप्रिल रोजी केले.

संकलित झालेल्या बी यांची लागवड पावसाळ्यामध्ये माळरानावर करण्यात येणार आहे. तसेच कुणाला अमलताश च्या बीयांची लागवड करायची असेल तर विद्यालयातर्फे बीया उपलब्ध करून देण्यात येतील. बी संकलन करण्यामधे वर्ग शिक्षक अरुण भगत यांनी व वर्ग प्रतिनिधी सोहम आशिष जोध, कु. जयश्री अमर देशमुख, कु. चंचल गजानन सावरकर, अख्तर रजा शेख जावेद, शेख कामरान शेख कलीम, सैय्यद साहील सैय्यद गफ्फार, सैय्यद रेहान सैय्यद उस्मान, शेख अरशद शेख अस्फाक, शे. अहेमद राजा शे. यूनुस, सै. फरहान सै. आसिफ, मो. सर्जील अब्दुल लतिफ, रेहान खान आसिफ खान कुरेशी, यांचेसह आदींनी सहभाग घेतला.

## शेगावात मिरवणुकीच्या वादातून दूध व्यावसायिकावर हल्ला

### चौघांविरुद्ध गुन्हा दाखल; बॅनर अडकल्याने भिंतीचा कोपरा पडला

प्रतिनिधी १६ एप्रिल

**शेगाव :** मिरवणुक मार्गाची पाहणी करताना ट्रॅक्टरला लावलेला बॅनर अडकून घराच्या भिंतीचा कोपरा पडल्याच्या कारणावरून झालेल्या वादात दूध व्यावसायिकावर काठ्यांनी हल्ला करून घरावर दगडफेक केल्याप्रकरणी शेगाव ग्रामीण पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना १४ एप्रिलच्या रात्री सुमारे ९.३० वाजता तालुक्यातील सवर्णा येथे घडली. फिर्यादी विजय सुधाकर पहुरकार (वय ३२, व्यवसाय दूध विक्री, रा. सवर्णा, ता. शेगाव) यांच्या घरासमोरून आरोपी रवी वाकोडे हा ट्रॅक्टरला बॅनर लावून मिरवणुकीच्या मार्गाची पाहणी करत होता. यावेळी बॅनर फिर्यादीच्या इलेक्ट्रिक केबलला अडकल्याने त्यांच्या घराच्या भिंतीचा कोपरा पडला. याबाबत फिर्यादीने विचारणा केली असता आरोपी रवी वाकोडे याने त्यांना धमकावले. या वादातूनच आरोपी प्रविण इंगळे याने दगडफेक केली, त्यावेळी गोंधळाचा आवाज ऐकून फिर्यादी व त्यांचे वडील बाहेर आले असता, आरोपी आनंद इंगळे व विवेक अजने हे काठ्या घेऊन तेथे आले आणि त्यांनी फिर्यादीला मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादीच्या उजव्या डोळ्याजवळील भुवईला दुखापत होऊन रक्तस्त्राव झाला, तसेच आरोपी प्रविण इंगळे याने शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी विजय पहुरकार यांच्या फिर्यादीवरून शेगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ११८(१), ३५२, ३५१ (२), ३५१ (३), ३२४(४) व ३(५) नुसार रवी वाकोडे, प्रविण इंगळे, आनंद इंगळे व विवेक अजने (सर्व रा. सवर्णा) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाची संवाद सभा उत्साहात

**जळगाव जामोद :** श्री संत सखाराम महाराज मंगल भवन येथे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, राज्य शिक्षक संघ, आयटीआय निदेशक संघटना व समविचारी संघटनांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक संवाद सभा पार पडली.

अध्यक्षस्थानी पी. एल. भुंबरे होते. प्रमुख अतिथी म्हणून दिलीप कडू, आशुतोष लांडे, राम बारोटे, एस. डी. भगत, डॉ. प्रा. एन. आर. निंबाळकर, डॉ.प्रा. पी. सी. डाबरे, व्ही. टी. भारसाकळे, डी. व्ही. इंगळे उपस्थित होते. दिलीप कडू यांनी शिक्षकांच्या समस्या, जीआर अभ्यास, प्रसूती रजा, वरिष्ठ व निवड श्रेणी, सेवा ज्येष्ठता यादी, आदी मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. शिक्षकांच्या विनाअनुदानित अडचणींवरही चर्चा झाली.

## युगधर्म विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



प्रतिनिधी १६ एप्रिल

**खामगाव :** येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात व आनंदात शाळेच्या प्रांगणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनाचा, शिक्षणाप्रती असलेल्या निष्ठेचा व समाज परिवर्तनातील त्यांच्या योगदानाचा प्रभावी आढावा घेतला. 'शिक्षण हेच खरे सामर्थ्य आहे,' हा त्यांचा संदेश विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

शाळेचे प्राचार्य अनिरुद्ध आवचार यांनी आपल्या भाषणात महामानवांचा जन्म महु येथे झाला असून त्यांची कर्मभूमी महाराष्ट्र राहिली, तसेच ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असल्याचे सांगितले.

## अनैतिक संबंधातून बुलढाण्यात तरुणाची हत्या

प्रतिनिधी १६ एप्रिल



### आरोपी फरार

**बुलढाणा :** शहरातील जयस्वाल चौकात मंगळवारी उशिरा रात्री झालेल्या चाकू हल्ल्यात सागर उर्फ पप्पू जाधव (वय ३८) याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, सोनू जाधव (रा. भीलवाडा) याच्यावर संशय व्यक्त करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शहरात मोठ्या उत्साहात मिरवणूक काढण्यात आली होती. सागर जाधव हादेखील या मिरवणुकीत सहभागी झाला होता. मिरवणूक आटोपल्यानंतर तो रात्री साडेअकराच्या सुमारास घरी परतत असताना जयस्वाल चौक परिसरात त्याच्यावर अचानक हल्ला करण्यात आला. आरोपीने पाठीवर धारदार शस्त्राने वार केल्याने सागर गंभीर जखमी झाला. घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. स्थानिक नागरिकांनी तत्काळ पुढाकार घेत सागरला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले; मात्र त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. प्राथमिक तपासात या हल्ल्यामागे जुना वाद असल्याचे उघड झाले आहे.सागर जाधव याचे आरोपीच्या एका निकटवर्तीय नातेवाईक महिलेशी निकटचे संबंध होते. त्यातून दोन्ही कुटुंबांमध्ये तणाव निर्माण झाला होता. कारणावरून आरोपी सोनू या जाधव हा सागरवर राग धरून होता. याच वैमनस्यातून हा हल्ला केल्याचा आरोप फिर्यादीकडून करण्यात आला आहे.दरम्यान, याप्रकरणी भारतीय न्याय संहितेतील खुनाच्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथके रवाना केली आहेत. घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा करण्यात आला

## जुन्या वादातून महिलेवर दगडाने हल्ला; दोघांवर गुन्हा

**शेगाव :** जुन्या वादातून एका महिलेला शिवीगाळ करून दगडाने मारहाण केल्याची घटना गणेश नगर येथे घडली. या प्रकरणी शेगाव पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मंगळवार, १४ एप्रिल रोजी रात्री सुमारे ९.३० वाजता ही घटना घडली. फिर्यादी प्रज्ञा मंगेश माळी(३७, रा. गणेशनगर, शेगाव) या किराणा दुकानाकडे जात असताना आरोपी दुर्गा महादेव माळी व महादेव भास्कर माळी (दोन्ही रा. गणेशनगर) यांनी जुन्या वादाच्या कारणावरून त्यांना शिवीगाळ केली.

फिर्यादीने जाब विचारताच आरोपींनी त्यांना लोटपाट करून चापटा-बुक्क्यांनी मारहाण केली. या प्रकरणी शेगाव पोलिसांनी आरोपींविरुद्ध भा.न्या.सं. कलम ११८(१), ११५(२), ३५२ व ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे

## श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी उत्सवाची सांगता

प्रतिनिधी १६ एप्रिल

**शेगांव :** शहरातील श्री स्वामी समर्थ केंद्रात गेल्या सात दिवसापासून विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते आज श्रीं स्वामी समर्थ पुण्यतिथी उत्सवाने या सप्ताहाची सांगता झाली आहे.

प्रतिवर्षानुसार श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने व आदेशानुसार अखंड नाम जप ,यज्ञ सप्ताहाचे आयोजन येथील श्री स्वामी समर्थ सेवा, अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र (दिंडोरी प्रणित), आठवडी बाजार शेगांव येथे दि ८ एप्रिल ते १५ एप्रिल दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते या सप्ताह कालावधीत पाचवा वेद म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री गुरुचरित्र या प्रासादिक ग्रंथाचे पारायण, अखंड प्रहरे यामध्ये सकाळी ६ ते रात्री ८ यावेळेत महिला, व रात्री ८ ते सकाळी ८ या वेळेत पुरुष प्रहरे सेवा दिली तसेच श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर येथून आलेल्या नियोजनानुसार दि.८ एप्रिल रोजी ग्रामदेवता स ग्रामदेवता सन्मान मंडल मांडणी, दि.९ रोजी मंडल स्थापना,



अग्निस्थापन, स्थापित देवता हवन, नित्य स्वाहाकार,दि.१० रोजी नित्य स्वाहाकार,गणेशा याग, मनोबोध याग, दि ११ नित्य स्वाहाकार, चंडी याग. दि.१२ नित्य स्वाहाकार, स्वामी याग.दि. १३ नित्य स्वाहाकार, गीताई याग. दि.१४ नित्य स्वाहाकार, रुद्र याग, मल्हारी याग. दि. १५ नित्य स्वाहाकार, बलि पूर्णाहुती , श्री.सत्यदत पूजन, देवता विसर्जन अखंड नाम जप यज्ञ सांगता झाली आहे

श्री स्वामीचरित्र सारामृत, श्री दुर्गासप्तशती पाठ, रुद्र आवर्तने, औदुंबर प्रदक्षिणा, सायंकाळी श्री विष्णुसहस्त्रनाम, गीतेचा १५ वा अध्याय, तुकारामाचा अभंग, पसायदान, मनाचे श्लोक, सांस्कृतिक कार्यक्रम, ग्रामाभियान प्रशिक्षण असे भरगच्च कार्यक्रम या सप्ताह कालावधीत संपन्न झाले आहे. दि १५ एप्रिल बुधवार रोजी श्री सत्यदत्त पूजन होऊन सकाळी ११ वाजता सप्ताह सांगता महाआरती करण्यात आली. श्री स्वामी समर्थ महाराज यांची पालखी सोहळा काढण्यात आली श्री स्वामी समर्थ जय जय श्री स्वामी समर्थ नामघोष करीत श्रींची पालखी छत्रपती संभाजी चौक, स्वामी विवेकानंद चौक मार्गाने पुन्हा केंद्रात आगमन झाले त्यानंतर जवळपास अडीच हजार भाविक भक्तांनी महाप्रसाद लाभ घेतला तर शहरासह तालुक्यातील हजारो भाविकांनी पहाटेपासूनच श्री स्वामींच्या दर्शनासाठी केंद्रांत गर्दी झाली होती. श्रीं स्वामी समर्थ मंदिर परिसरात आकर्षक अशी विद्युत रोषणाई करण्यात आली होती तर मंदिर परिसरात आंब्याच्या पानांचे तोरण व केळीचे खांब, रंगीबेरंगी फुलांचे सजावट करण्यात आली आहे.

### श्री. गुरुचरित्र पारायण

दि.८ ते १५ एप्रिल असे सात दिवसांच्या सप्ताहात श्री गुरुचरित्र पारायणा करीत जवळपास ३३१ हुन अधिक भाविकांनी श्री गुरुचरित्र पारायण केले आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६

http://epaper.citynewssuperfast.com


# विजय अग्रवाल आणि सागर भारूका वाद चिघळला

## ■ महापालिका आवारात भारूका अग्रवाल यांच्यावर चालून गेले



प्रतिनिधी १६ एप्रिल

**अकोला :** १३ एप्रिल रोजी महापालिका स्थायी समितीच्या बैठकीत सभापती विजय अग्रवाल आणि नगरसेवक सागर भारूका यांच्यात झालेला वाद, महापौर आणि महिला सदस्यांच्या उपस्थितीत वापरलेली शिवराळ भाषा याचे पडसाद अजूनही उमटत आहेत. भारूका यांच्या समर्थनार्थ प्रभाग क्रमांक १२ मधील नागरिकांनी पोस्टर लावले. त्यामुळे हे प्रकरण गंभीर झाले आहे. बुधवारी सायंकाळी महापालिकेच्या आवारात भारूका विजय अग्रवाल यांच्या अंगावर धावून गेले. त्यामुळे मोठा राडा झाला. अग्रवाल यांनी या बाबत सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दिली. आणि कारवाईची मागणी केली. अकोला महपालिकेत भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना शिंदे पक्ष सत्तेत सामील आहेत. असे असताना अग्रवाल आणि भारूका यांच्यात सभागृहात सातत्याने होत असणारा वाद चर्चेचा विषय झाला आहे. एकमेकांना पाहून घेण्याची भाषा वापरणे, शिवीगाळ करणे यामुळे सभागृहाचे पावित्र्य नष्ट होत आहे याचे भान राखले जात नाही. यासाठी आम्ही तुम्हाला सभागृहात पाठवले का अशी विचारणा अकोलेकर करीत आहेत. सागर भारूका यांना पंधरा दिवसांसाठी निलंबित केल्यामुळे वाद गंभीर झाला आहे. या प्रकरणात पक्षश्रेष्ठी लक्ष घालतील का अशी विचारणा होत आहे.






### सागर भारूका यांचे पोस्टर काढल्याने भारूका संतप्त

**अकोला:** शिवसेना नगरसेवक सागर भारूका यांच्या समर्थनार्थ लावलेले पोस्टर महापालिकेच्या पथकाने हटवले. या बाबत शिवसेना जिल्हा प्रमुख मंगेश काळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरातील अतिक्रमण दिसत नाही का. मग आमच्या नगरसेवकाचे पोस्टर कसे काढता असा सवाल त्यांनी केला. काही वेळाने भारूका आणि काळे महापालिकेत पोहोचले. भारूका भाजप समर्थकांच्या अंगावर धावून गेले. त्यांच्यात झटापट झाली. मंगेश काळे यांनी मध्यस्थी करून भारूका यांच्यासह निघून गेले. तेवढ्यात स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल देखील चेंबर मधून बाहेर आले होते. परंतु तोपर्यंत भारूका एका वाहनात बसून निघून गेले होते. हे प्रकरण आता कोणते वळण घेणार याची चर्चा सुरू आहे.

### शहरातील अतिक्रमण दिसत नाही का

नगरसेवक सागर भारूका यांच्या समर्थनार्थ लावलेले पोस्टर महापालिकेने तातडीने काढले. परंतु शहरातील अतिक्रमण मनपा यंत्रणेला दिसत नाही का असा सवाल



शिवसेना शिंदे पक्षाचे जिल्हाध्यक्ष मंगेश काळे यांनी केला. तसेच भारूका यांना निलंबित करण्याच्या निर्णयाचा त्यांनी निषेध केला. तुम्ही शिवीगाळ करणार आणि सदस्याला निलंबित करणार. हा कोणता न्याय आहे असे मंगेश काळे बुधवारी दुपारी आर आर सी नेटवर्कशी बोलताना म्हणाले.

### विजय अग्रवाल यांची भारूका विरुद्ध तक्रार

स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी बुधवारी सायंकाळी सिटी कोतवाली पोलिस स्टेशन मध्ये नगरसेवक सागर भारूका विरुद्ध तक्रार केली. या वेळी त्यांनी भारूका यांच्यावर



गंभीर आरोप केले. सागर भारूकाने महापालिकेत येऊन खुर्च्यांची फेकाफेक केली. अधिका-यांना शिवीगाळ केली. तसेच माझ्या अंगावर धावून आले. भारूकाच्या खिशात चाकू होता. मला मारण्याचा प्रयत्न केला. ही व्यक्ती गांजा, चरसचे सेवन करते. जुगार चालवते याची पोलिसांना माहिती आहे. अशा व्यक्ती विरूद्ध कारवाई करण्यात यावी अशी मागणी विजय अग्रवाल यांनी तक्रारीत केली. भाजपा महानगर अध्यक्ष जयंत मसने आणि पक्ष कार्यकर्ते त्यांच्या समवेत होते.

# जिल्ह्यात उष्माघातापासून बचावासाठी 137 खाटा राखीव – जिल्हाधिकारी मीना

## ♦ रूग्णालये, यंत्रणा सुसज्ज ठेवा, उष्माघात उपाययोजनांबाबत आढावा




प्रतिनिधी १६ एप्रिल

**अकोला :** जिल्ह्यात वाढते तापमान, उष्मालाटेचा इशारा लक्षात घेता शासकीय रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्रा. आ. केंद्र येथे १३७ खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तसेच दक्षतेबाबत प्रभावी जनजागृती करावी, सर्व रूग्णालये, यंत्रणा सुसज्ज ठेवाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी बुधवारी उष्माघात उपाययोजनांबाबत घेतलेल्या आढावा बैठक दिले.

आढावा बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आरती कुलवाल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठाता डॉ. संजय सोनूने आदी यावेळी उपस्थित होते. प्रत्येक आरोग्य संस्थेत उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आला आहे. जिल्ह्यात शासकीय रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्रा. आ. केंद्र येथे १३७ खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. ओआरएस व औषधसाठा पुरेसा ठेवावा. त्याचप्रमाणे, नागरिकांमध्ये उष्माघातापासून दक्षता बाळगण्याबाबत प्रभावी जनजागृती करावी. ग्रामीण भागात दवंडी देऊन जनजागृती करावी महापालिका क्षेत्रात कचरा घंटागाडीमार्फत माहिती द्यावी. त्याचप्रमाणे, शहरात व जिल्ह्यात होर्डिंग्ज, सूचना, ध्वनीचित्रफीती आदींद्वारे प्रभावी जनजागृती करावी. त्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी, असेही निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

उष्माघात टाळण्यासाठी सर्व नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आरती कुलवाल यांनी केले आहे. यावेळी डॉ. मेश्राम, आरडीसी मालथने, डॉ. जावेद खान आदी उपस्थित होते.

### अशी आहेत उष्माघाताची लक्षणे

◆शरीराला घाम येणे, जास्त तहान लागणे, त्वचा कोरडी पडणे, १०२ अंशांपेक्षा जास्त ताप येणे, चक्कर येणे, डोकेदुखी, अस्वस्थता, उलटी किंवा बेशुद्धावस्था ही उष्णतेमुळे होणाऱ्या आजाराची लक्षणे आहेत. उष्माघाताची लक्षणे दिसल्यास तातडीने रुग्णाचे शरीर तापमान कमी करण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार घ्यावेत, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी नागरिकांना केले.

### उष्माघात टाळण्यासाठी हे करा!

- ◆ डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करावा.
- ◆हलक्या रंगाचे सुती कपडे घालावेत.
- ◆दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो घरातच राहावे.
- ◆भरपूर पाणी पिण्यासोबत ताक, लिंबूपाणी, नारळपाणी यांचे सेवन करावे.

### उष्माघातापासून बचावासाठी हे टाळा!

- ◆ दुपारी १२ ते ४ दरम्यान उन्हात काम करणे टाळावे.
- ◆अनवाणी उन्हात चालू नये.
- ◆लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद गाडीत ठेवू नये.
- ◆मद्य, चहा, कॉफी व जास्त साखरयुक्त किंवा कार्बोनेटेड पेये टाळावीत.

# महिलेच्या मृत्यू प्रकरणी सासरच्या सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल

## ♦ मुलीची आत्महत्या नसून घातपात असल्याचा वडिलांचा आरोप

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अकोला :** दाबकी रोड पोलिस स्टेशन अंतर्गत भावना विशाल घाटोळे या महिलेच्या आकस्मिक मृत्यूची नोंद पोलिसांनी घेतली होती. मात्र, महिलेच्या माहेरच्या लोकांनी तिची आत्महत्या नसून घातपात असल्याचा आरोप केला. शेवटी सहा दिवसांनी या प्रकरणात दिलेल्या तक्रारी वरून पोलिसांनी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. तसेच आरोपींचा शोध सुरू असल्याचे उपविभागीय अधिकारी सुदर्शन पाटील यांनी सांगितले.

९ एप्रिल रोजी भावना घाटोळे हिने आत्महत्या केल्याचे तिच्या माहेरच्या लोकांना सांगितले होते.



दाबकी रोड पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेऊन मृतदेह उत्तरीय तपासणी साठी पाठवला. पीएम रिपोर्ट अद्याप यायचा आहे. या प्रकरणी आम्हाला न्याय द्या तसेच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करा या मागणीसाठी महिलेचे नातेवाईक पोलिस स्टेशनवर पोहोचले होते. त्या नंतर महिलेचा पती विशाल घाटोळे, सासू रेखा,सासरा सुनील, जेठ हर्षल, जेठानी अदिती, नणंद अश्विनी आणि कमळाबाई तळोकार अशा सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत.




# शर्यतीचे रूपांतर झाले विकृतीत !

प्रतिनिधी १६ एप्रिल

**अमरावती :** अमरावतीमधील मुलींचे लैंगिक शोषण आणि ब्लॅकमेल करण्याचे प्रकार कदाचित बिनबोभाट सुरुच राहिला असता, कारण बदनामीच्या भीतीने पीडित महिला पुढे येण्यास धजावत नव्हत्या. मात्र या प्रकरणातील दोन मुख्य आरोपी अयान अहमद आणि उझैर खान यांच्या आपापसातील वादामुळेच अखेर या संपूर्ण प्रकरणाचा पर्दाफाश झाला.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अयान अहमद आणि उझर यांच्यात 'शर्यत' लागली होती की, आपल्यापैकी कोण अधिक मुलींना मोहात पाडू शकेल. पुढे या शर्यतीचे रुपांतर एका विकृत छंदात झालं. दोघं आपल्या 'कृत्यां'चं चित्रीकरण करायचे आणि ते व्हिडिओ ऑनलाइन अपलोड करायचे. अचलपूर नगर परिषदेचे नगरसेवक मुजीब रशीद यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या दोन आठवड्यांपासून अयान अहमदचे व्हिडिओ व्हायरल होण्यास सुरुवात झाली होती. 'दहा दिवसांपूर्वी मला या व्हायरल व्हिडिओंबद्दल समजलं होतं, तरीही मी ते प्रत्यक्ष पाहिलं नव्हतं. मी त्याला गाठलं; त्याने माझी वारंवार माफी मागितली. ज्या वयात त्याने अभ्यासावर लक्ष केंद्रित करायला हवं, त्या वयात मुलींच्या मागे लागून तो आपले आयुष्य उद्ध्वस्त करत आहे, असा इशारा मी त्याला दिला. अयानने आपली वर्तणूक सुधारण्याचे वचन दिलं आणि तो तिथून निघून गेला' असं रशीद म्हणाले. रशीद यांना कल्पना नव्हती की, हा काही दोन सज्ञान प्रेमी युगुलांचा चुकून लीक झालेला व्हिडिओ नव्हता, तर १८ लैंगिक व्हिडिओ आणि ३९ आक्षेपार्ह फोटोंची एक मालिका होती, तिचं रुपांतर पुढे जाऊन लैंगिक शोषण आणि ब्लॅकमेलिंगमध्ये झालं. या लैंगिक शोषणाचा सूत्रधार अयान अहमद हा अचलपूर येथील एका महाविद्यालयात दुसऱ्या वर्षाला शिकत होता.

### अयान अहमद एमआयएमचा माजी सदस्य

अयानचा परिचित असलेल्या एका स्थानिक राजकारण्याने सांगितलं की, अयान आणि उझर यांच्यात पैशांवरुन वाद झाला होता. त्यानंतर उझरने संतापाच्या भरात ते व्हिडिओ ऑनलाइन अपलोड केले. अयान अहमद हा एमआयएमचा माजी सदस्य आहे. तो अमरावतीसाठी पक्षाच्या सोशल मीडियाचे कामकाज सांभाळत असे.

# विधान परिषदेच्या 17 जागांसाठी लवकरच निवडणूक !

## ९ जागांचा कार्यकाळ संपुष्टात; विदर्भातील ५ मतदारसंघांचा समावेश



प्रतिनिधी १६ एप्रिल

**मुंबई:** विधान परिषदेच्या ९ जागांसाठी पुढील आठवड्यात निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. विधान परिषदेच्या ९ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येणार आहे. तर अडीच वर्षापासून रिक्त असलेल्या विधान परिषदेच्या १७ जागांचीही निवडणूक लवकरच होणार असल्याची माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे यात विदर्भातील पाच मतदारसंघांचा समावेश आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्याने विधान परिषदेच्या १७ जागा भरण्यासाठी हालचाली सुरू आहेत. १७ मतदारसंघातील निवडणुकीसंदर्भातला अहवाल लवकर केंद्रीय निवडणूक आयोगाकडे पाठवला जाणार आहे. २० जिल्हा परिषदाची निवडणूक बाकी असली तरी परिषदेच्या १७ जागांची निवडणूक घेण्यास कोणतीही अडचण नसल्याची सूत्रांची माहिती आहे. विधान परिषदेच्या ९ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येणार आहे. विधानसभेतील संख्याबळानुसार भाजपच्या वाट्याला ५, शिवसेना २, राष्ट्रवादी १ आणि महाविकास आघाडी १ जागा येण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादीकडे अतिरिक्त १३ मतं असल्यामुळे महायुतीने आणखी उमेदवार देण्याचे ठरवल्यास निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता कमी आहे.

### या ९ आमदारांचा कार्यकाळ संपणार

- उद्धव ठाकरे (शिवसेना - उबाठा)
- नीलम गोऱ्हे (शिवसेना)
- शशिकांत शिंदे (राष्ट्रवादी - शरद पवार गट)
- अमोल मिटकरी (राष्ट्रवादी - अजित पवार गट)
- गोपीचंद पडळकर (भाजप)
- रणजितसिंह मोहिते-पाटील (भाजप)
- राजेश राठोड (काँग्रेस)
- प्रवीण दटके (भाजप)
- रमेश कराड (भाजप)

### असे आहेत संभाव्य निवडणूक होणारे मतदारसंघ

यवतमाळ, भंडारा-गोंदिया, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, नागपूर, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजी नगर-जालना, पुणे, सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड.

### महायुतीचे ८ उमेदवार सहज निवडून येऊ शकतात

विधान परिषदेचा एक आमदार निवडून येण्यासाठी २८ मतांचा कोटा आवश्यक आहे. महायुतीत भाजप (१३१ आमदार), एकनाथ शिंदे यांची शिवसेना (५७ आमदार) आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी (४० आमदार) असे बलाबल पाहता महायुतीचे ८ उमेदवार सहज निवडून येऊ शकतात. तर महाविकास आघाडीचे एकूण संख्याबळ ४६ आहे. त्यामुळे त्यांचा केवळ एकच उमेदवार सहज निवडून येऊ शकतो. दुसऱ्या जागेसाठी त्यांना १० मतांची जुळवाजुळव करावी लागेल, जे सध्याच्या स्थितीत कठीण दिसत आहे.

# प्रभातची आर्या राठी 99.80 टक्के गुण घेऊन अव्वल

## ♦सीबीएसई दहावी निकाल : शुभ पटेल ९९.४० टक्के घेऊन दुसऱ्या स्थानावर







प्रतिनिधी १६ एप्रिल

**अकोला :** सीबीएसई दहावीचा निकाल नुकताच जाहिर झाला असून अकोला येथील प्रभात किड्स स्कूलची विद्यार्थीनी आर्या राठी हिने ५०० पैकी ४९९ (९९.८० टक्के) गुण घेऊन अव्वल स्थान पटकाविले आहे. तसेच शुभ पटेल या विद्यार्थ्याने ९९.४० गुण मिळवून दुसरा क्रमांक मिळविला आहे. आर्याला ४ विषयात १०० पैकी १०० गुण असून एका विषयात ९९ गुण आहेत. त्यासोबतच शरयु राऊत ९८.८०, गायत्री येवले ९८.२०, स्वराली जामकर ९८.२०, समृद्धी अंधारे ९८.००, यथार्थ माणिकराव ९८.००, अक्षरा इंगळे ९८.००, क्रीष्णा भुजाडे ९८.०० टक्के, सार्थक नागे ९७.८०, प्रणाली खांदेल ९७.८०, गार्गी गरकल ९७.८०, पार्थ इंगवले ९७.८०, रजत तायडे ९७.६०, यश गिरी ९७.६०, अंजली वाकोडे ९७.००, पार्थ देशमुख ९६.८०, सर्वेश धोलवडे ९६.८०, अन्वी जायभाये ९६.८०, आदित्य बाहेकर ९६.६०, रैवत देशपांडे ९६.६०, शरवरी गरकल ९६.६०, श्रावणी ढोरे ९६.६०, समर शिंदे ९६.६०, शाश्वत महल्ले ९६.२०, अर्णव टोंगसे ९६.२०, अलंकार डंबाळे ९६.२०, प्रणिल नावकार ९६.००, आर्यन उन्हाळे ९६.००, माही अग्रवाल ९६.००, श्रीशांत सुर्यवंशी ९५.८०, जान्हवी तराळे ९५.८०, राशी खवले ९५.८०, श्रावणी कवलकर ९५.८०, अथर्व आखरे ९५.८०, आरुष घोडे ९५.६०, सई देशमुख ९५.६०, रितीका आलिमचंदानी ९५.६० यांना ९६ टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले. याशिवाय परीक्षेला बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी १०२ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत.

एकूण ६३ विद्यार्थ्यांनी विविध विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त करून सीबीएसई बोर्डात प्रथम येण्याचा मान प्राप्त केला आहे. याशिवाय गणित विषयात ११ जणांना ९० पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. मराठी विषयात १० विद्यार्थ्यांना १०० पैकी १०० गुण मिळाले असून ७८ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण आहेत. संस्कृत विषयांमध्ये १४ विद्यार्थ्यांना पैकीची पैकी गुण मिळाले असून ५२ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण आहेत. हिंदी विषयांमध्ये ११ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. विज्ञान विषयांमध्ये २ विद्यार्थ्यांना पैकीचे पैकी गुण मिळाले असून ५९ विद्यार्थ्यांना ९० पेक्षा जास्त गुण आहेत. समाजशास्त्र विषयात १ विद्यार्थी पैकीचे पैकी मिळवून अव्वल ठरला आहे. तर १०१ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण आहेत. माहिती व तंत्रज्ञान विषयात ३३ विद्यार्थ्यांना पैकीचे पैकी गुण मिळाले असून १५८ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. इंग्रजी विषयांमध्ये ३ विद्यार्थ्यांना पैकीचे पैकी गुण मिळाले असून १०७ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. सर्व यशस्वी गुणवंतांचे प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, सचिव निरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, व्यवस्थापक अभिजीत जोशी, समन्वयक मो. आसिफ, सीबीएसई समन्वयक प्रशांत होळकर, स्पर्धा परीक्षा प्रमुख व्ही अनुराधा यांनी अभिनंदन केले.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK